RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN-2349-3984
*Issue - XXXI*

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

*(A Quarterly Journal)*

**October to December 2023**

**Peer Reviewed and Refereed Journal with**
**Journal Impact Factor : 5.769**

## MULTIDISCIPLINARY

**MANAVLOK SOCIAL WORK COLLEGE**

Post Box No. 23
Ring Road, Ambajogai, Dist.Beed, (MS) Pin-431 517
E-mail:- manavlok1999@gmail.com
Websit :- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

MANAVLOK RESEARCH BULLETIN

RNI No. MAHMUL/2013/54090 ISSN – 2349-3984
Issue – XXXI

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A Quarterly Journal)
October - December 2023

**MANAVLOK SOCIAL WORK COLLEGE, AMBAJOGAI**
Post Box No-23
Ring Road, Ambajogai, Dist. Beed, (MS) Pin -431517
E-mail:-manavlok1999@gmail.com
Website:- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

**Manavlok Research Bulletin is published quarterly in the Month of March, June, September & December every year**
**by**
**Manavlok Social Work College, Ambajogai, Dist Beed.**

**Chairman**
**Dr. Prakash Jadhav**
**Principal**,
Manavlok Social Work College

**Editorial Board**
**Dr. Nazir Sheikh**
Editor
Manavlok Social Work College
**Dr. Arundhati Patil**
Manavlok Social Work College
**Dr. Rama Pande**
Manavlok Social Work College
**Sukeshini Jogdand**
Manavlok Social Work College

**Advisory Board**
**Dr. Keshav Walke**
Professor,
Matru Seva Sangh Institute of Social Work,
Nagpur
**Dr. Smita Awachar,**
HOD,
Department of Sociology, Dr. B.A.M.University,
Aurangabad
**Dr. Gangadhar B. Sonar,**
Chairman
Dept. of Social Work, Karnataka State
Akkamahadevi Women's University, At Toravi- 586108
Dist. Vijaypura, Karnataka
Email: gbsonar@kswu.ac.in
**Dr. Avinash Gedam**
Mahatma Jyotiba Phule College of Social Work, Chikhali
Road, MIDC, Buldhana
**Dr. Pandit Chavan**
Vasantrao Naik Mahavidyalya, Nanded.
**Dr. Nilesh Deshmukh**
Principal,
Ramrao Sarnaik College of Social Work, Washim.
**Dr. Ashok Chavan**
Assst. Prof. Late Rameshrao Varpudkar College,
Sonpeth, dist. Parbhani
**Dr. Kisan Pawar**
Principal, Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wadvani, Dist. Beed
**Dr. Rajkumar Mhaske**
Principal, Jalna College of Social Work,
Ramnagar, Jalna
**Dr. Manisha Manjramkar**
Associate Professor, Jawaharlal Nehru College of
Social Work, CIDCO, New Nanded
**Dr. Sakure S. M.**
Principal, Sushilabai Ramchandrarao
Mamidwar College Of Social Work
Padoli, Chandrapur, 442406

**Date of Publication:- 25 December - 2023**

**Payment by Demand Draft/M.O in favour of :**
**'Principal Manavlok Social Work, Ambajogai.'**
***Price : Rs. 100/-***

**Typeset By:-** Bibhishan Ghadge, Ramdas Kale, Niranjan Jogi
Manavlok Social Work College, Ambajogai

# MANAVLOK RESEARCH BULLETEIN

## *Theme for forthcoming issue*

---

## MULTIDISCIPLENARY

**January – March 2024**

---

Research articles/papers up to 3000-4000 words are invited on the above mentioned themes. The authors are requested to send the articles/papers/review of books etc in the form of hard and softcopy or email. The article should reach before the last date of submission at the below address.

**Principal,**
Manavlok Social Work College,
Ring Road, Ambajogai Dist Beed.
Maharashtra-431517
Email:- manavlok1999@gmail.com

Manavlok's college invites research papers and reviews for Manavlok Research Bulletin. The research paper must be original and unpublished. The Editor is not responsible for the papers that have appeared elsewhere.
The views expressed in the articles published in the Journal are those of the Authors and the Manavlok's College of Social Work, Ambajogai- Manavlok's Research Bulletin does not hold itself responsible for them.

## CALL FOR PAPERS

**Manavlok Research Bulletin (a Quarterly journal)  ISSN: 2349-3984**

Manavlok Social Work College has started multilingual (English, Hindi & Marathi) quarterly journal with ISSN No. 2349-3984 which publishes in March, June, September and December every year. It is aimed to promote the quality research articles/paper. This journal provides a platform for the researcher, academicians, social work professionals and students from the discipline of social Work.

**Call for Papers: -** Quality research papers/articles are invited in English, Hindi & Marathi language.

**Guidelines for paper submission:-**

- Papers should be typed in MS Word, Times New Roman, Font Size 12
- For Marathi &Hindi use DVB-TTsurekh, Font Size 14
- Full paper should not exceed more than 3000 words.

**Guidelines for Autours :-**

- ABSTRACT (TNR 11 Bold)
- KEYWORDS (TNR 11Bold)
- INTRODUCTION (TNR 11 BOLD)
- HEADING S (TNR 11 BOLD)
- FIGURES AND TABLES (TNR 11 BOLD)
- CONCLUSIONS (TNR 11 BOLD)
- ACKNOWLEDGEMENTS (TNR 11 BOLD)
- REFERENCES (TNR 11 BOLD)

**Format for research article:-**

1. Abstract
2. Key words
3. Introduction
4. Problems/objectives
5. Methodology (coverage, sampling, tools of data collection and data analysis, use of statistics etc)
6. Conclusions
7. References: - References should be embedded in the text in a consistent style, for instatnce, Patil, A.S. 2013. "Social Work Research: An Overview", Aai Publications, Ambajogai.

**Research paper/Article to be sent Email: -**manavlok1999@gmail.com, **Hard & Soft** copy at College Address

**Subscription Amount:**

1) Annual Individual Membership - Rs. 1000/- + Rs. 160/- (reg. postal charges)
2) Annual Institutions Membership - Rs. 1200/- + Rs. 160/- (reg. postal charges)

(Payment by DemanDraft/M.O in favour of - Principal, Manavlok Social Work College. Ambajogai )

3) **Bank Details. :-** Bank of Maharashtra, Branch Ambajogai
A/C/ No. – 60178141511,
IFSC Code- MAHB0000037

**Note:** New Subscription fees will be effective from 1st July 2015 to onwards.

**Contact:**

- Dr. Prakash Jadhav, Principal, Manavlok Social Work College, Ring Road, Ambajogai, 431517 Dist Beed (Maharashtra) Cell No. 7770015050
- Dr.Arundhati Patil - 9422744166, Dr.Rama Pande-9405343510, Lect. Sukeshini Jogdand-9405826977.
- Dr. Sheikh Nazir, Editor, Manavlok Research Bulletin, Manavlok College of Social Work, Ring Road, Ambajogai, 431517 Dist. Beed (Maharashtra) Cell No. 9421281850, 7770015057

## CONTENTS


| Sr. No | Name of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1. | समाजकार्याच्या व्याख्या, अर्थ आणि नितीतत्त्वेः एक अभ्यास<br>*गोविंद प्रल्हाद कातकडे, प्रा. डॉ. नजीर जब्बार शेख* | 02 |
| 2. | स्थलांतर आणि एकल महिला ऊसतोड कामगार<br>*कामिनी आशा हिरामण पवार, डॉ. नजीर जब्बार शेख* | 09 |
| 3. | वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांना समायोजनात येणाऱ्या अडचणी व आरोग्याच्या समस्यांचा अभ्यास<br>*पवन सोमनाथअप्पा गिरवलकर* , डॉ. नजीर जब्बार शेख | 14 |
| 4. | वृध्दांचे कौटुंबिक सामाजिक समायोजन : एक प्रश्न<br>*पिराजी विठ्ठलराव कमळे, प्रा. डॉ. अरुंधती पाटील* | 19 |
| 5. | उपजीविका आणि आर्थिक समावेशन ; राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची महिलांच्या आर्थिक सहभाग व स्वावलंबनाच्या योगदानाचा अभ्यास) संदर्भ लातूर तालुका<br>*प्रकाश सुभाषराव राठोड, डॉ. हनुमंत साळुंके* | 29 |
| 6. | कोविड–**19** मध्ये कुटुंब प्रमुखाच्या मृत्यूमुळे कुटुंबांवर येणाऱ्या तात्कालिक आव्हानांचा अभ्यास : एक व्यष्टी अध्ययन<br>*भद्रे प्रतिभा विश्वनाथ, प्रा. डॉ. अरुंधती पाटील* | 38 |
| 7. | अहमदनगर जिल्ह्यातील तृतीय पंथीयांची सामाजिक-आर्थिक वास्तविकता आणि आव्हाने ;लक्ष केंद्रित गट चर्चा<br>*राधाकिशन नवनाथ देवढे ,डॉ. प्रकाश जाधव* | 44 |
| 8. | समृद्ध महाराष्ट्राच्या वाढत्या पाणी संकटातून उद्धवणाऱ्या दुष्काळाची मीमांसा<br>*राहुल महादेव गिरी, प्रा. डॉ. अरुंधती पाटील* | 53 |
| 9. | इस्लामिक बँक आणि महिला बचत गट या संस्थेच्या मध्यमाने मुस्लिम महिला व तालक पिडीत महिलांचा विकास एक अध्ययन<br>*समीर इब्राहीम शेख, डॉ. नजीर जब्बार शेख* | 60 |

# समाजकार्याच्या व्याख्या, अर्थ आणि नितीतत्त्वे: एक अभ्यास

***प्रा. डॉ. नजीर जब्बार शेख***
मार्गदर्शक
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय व
संशोधन केन्द्र, अंबाजोगाई

***गोविंद प्रल्हाद कातकडे***
संशोधक विद्यार्थी
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय व
संशोधन केन्द्र, अंबाजोगाई

**प्रास्ताविक (Introduction)**

सामाजिक समस्यांचे अस्तित्व पुरातन काळापासून प्रत्येक समाजामध्ये आढळते. म्हणूनच, अशा समस्यांच्या निवारणासाठी समाजसेवा हा प्रत्येक समाजाचा घटक आहे. साथीदाराबद्दल प्रेम, बंधुभावाची भावना, आपल्या समुदायातील लोकांची सेवा करण्याची गरज यासारखे घटक समाजसेवेचे मानले जातात. थोडक्यात, या समस्या हाताळाण्यासाठी वापरण्यात आलेल्या पध्दती हा समाजाच्या गरजा आणि संशोधने यावर अवलंबून असतात. समाजकार्य, परस्पर सहाय्य, दान आणि विश्वबंधुत्व याबाबत भारतीची परंपरा जगातील इतर देशाइतकीच प्राचीन आहे. इंग्लंड अमेरिकेसारख्या देशात समाजकार्याचा विकास संस्थात्मक सेवा किंवा सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांच्या रूपात झाला आहे. मात्र भारतात १९ व्या शतकात इंग्रजी राजवटीतच नव्हे तर स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत समाजकार्याचा आवश्यक इतका विकास होऊ शकला नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव तसेच आर्थिक व सामाजिक कारणामुळे ते होऊ शकले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजकल्याणाच्या क्षेत्रात एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला तरी सुध्दा एक व्यवसाय म्हणून त्याचा देशभर अजून प्रसार झाला नाही, भारतातील समाजकल्याणाच्या इतिहासाचा आढावा तीन कालखंडाच्या संदर्भात घेता येतो जसे कि, प्राचीन व मध्ययुगीन काळ, ब्रिटीश राजवटीचा काळ, स्वातंत्र्योत्तर काळ इ. त्याच बरोबर नितीतत्त्वांचा विचार केला असता प्रथा, सवयी नितित्त्वे याचा अर्थ होतो. कांही तज्ञ यांना बाहेरून लादलेली बंधने मानतात. नितितत्त्वे माणसाचे शील, चारित्र्य, स्वभाव व वृत्ती कशा असाव्यात याबद्दल सांगतात. वर्तणूक, सभ्यता, संस्कृती, संस्कृतपणा याबद्दल मार्गदर्शन करतात. निती हे ज्ञान आहे. ते कृतींना मार्गदर्शन करतात. थोडक्यात, नितीतत्त्वाची बंधने जेव्हा पाळली जातात तेंव्हाच नीतितत्त्व प्रत्यक्षात उतरले जाते.

सामाजिक समस्यांच्या निर्मुलनासाठी समाजकार्यांचा विकास झाला आहे. समाजातील विविध समस्या शारीरिक, आर्थिक, सामाजिक, सामाजिक, मानसिक यासारख्या घटकांच्यामुळे होतात. समस्याग्रस्त व्यक्तींच्या समस्या सोडविणे व त्यांच्या गरजा पूर्ण करणे व साहाय्य करेण हे समाजकार्यांचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. याच अनुषंगाने समाजकार्याच्या इतिहासाचा आढावा घेणे गरजेचे वाटते तो खालीलप्रमाणे.

**उद्दिष्ट्ये (Objectives)**

१. समाजातील विविध समस्या सोडविण्यासाठी समाजकार्याची मदत होईल.
२. समाजकार्याच्या आधारे समस्यांचे निदान करून शोधता येईल.

**संशोधन पध्दती (**Research Methods**)**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला गेलेला आहे. त्याच बरोबर प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती चा वापर केलेला आहे.

**समाजकार्य व्याख्या (Definition of Social)**

विसाव्या शतकात बांधिलकीच्या जाणीवा जागृत होऊन त्यांचा प्रसार व विकास झाला त्यातून समाजकार्य ही एक संकल्पना भारभराटीस आली. समाजातील गरीब, दुःख कष्टी, दुबळे आणि रंजलेले गांजलेले लोक किंवा जनसमूह यांना खाजगी किंवा सार्वजनिकरित्या मदतीप्रित्यर्थ पुरविलेली सेवा म्हणजे समाजकार्य होय. युरोपमध्ये खाजगी औदार्याला संघटीत व संख्यात्मक स्वरूप देशाचे प्रयत्न इंग्लीश पुअर लॉद्वारे इ.स. १६०१ मध्ये करण्यात आले. या कृतीचा प्रत्यक्ष विकास ग्रेट ब्रिटन जर्मनी व अमेरिका या देशात एकोणिसाव्या शतकात झाला.

समाजकार्य ही समाजाचे हित व विकासासाठी असलेली एक मोठी व व्यापक संकल्पना आहे. या संकल्पनेत समाजातील दीनदुबळ्या लोकांच्या कल्याणासाठी केलेले कार्य अभिप्रेत असून विविध प्रकारे हे सेवाकार्य करण्यात येते. केवळ स्वतःला पुण्य लाभावे म्हणून समाजीती वंचित गटांना सहाय्य करणे किंवा भतदयेपोटी दीनदुबळ्यांची सेवा करणे म्हणजे समाजकार्य नव्हे समाजसेवा, समाजसुधारणा, सामाजिक सुरक्षितता, समाजकार्य आणि समाजकल्याण हे शब्द अनेकदा समान आर्थने वापरले जातात. याबाबत काहीसा गोंधळ व संदिग्धता निर्माण होण्यामागे एक कारण असे आहे की, या सर्व संकल्पनांचे ध्येय समान असून ते लोककल्याण किंवा जनस्वास्थ्य होय. विसाव्या शतकात समजाकल्याण या संकल्पनेवर सर्वांगिण विचार विनिमय झाला आहे. अनेक समाजशास्त्रज्ञांनी या संकल्पनेची व्याख्या केली असून तिचा उहापोहही केला आहे. त्यापैकी कांही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) फ्रिडलॅटरः** यांनी पुढील शब्दात समाजकार्य या संज्ञेची व्याख्या केली आहे. ‘‘समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे. हा व्यवसाय शास्त्रीय ज्ञानावर व मानवी संबंधाच्या कौशल्यावर आधारीत आहे. एखाद्या व्यक्तीला किंवा गटाला अशी मदत केली जाते. जेणेकरून त्यांच्यात वैयक्तिक व सामाजिक व सामाजिक समाधान निर्माण होऊन स्वावलंबनाची प्रक्रिया सुरू होईल. समाजकार्य हे एखाद्या संस्थेमार्फत किंवा संघटनेमार्फत केले जाते.’’

**२) स्ट्राईपः** यांच्या मते, समाजकार्य हे जसे शास्त्र आहे तसेच ती एक कला ही आहे. त्यंच्या मते ‘‘व्यक्ति, गट किंवा समुदायांच्या गरजांच्या पूर्तीसाठी सर्व प्रकारच्या सधनांचा एकत्रित वापर करून लोकांना स्वतःचे प्रश्न स्वतः सोडविण्यास सक्षम करणे म्हणजे समाजकार्य होय.’’

३) सामाजिक कार्य करणाऱ्या भारतीय परिषदेने १९५७ मध्ये समाजकार्याची व्याख्या अशी केली आहे की, ‘‘समाजकार्य ही कल्याणकारी कृती आहे समाजकार्य हे मानवतावाद, शास्त्रीय ज्ञान व तांत्रिक कौशल्ये यावर आधारीत आहे. व्यक्ति समूह किंवा समुदायाचे आयुष्य अधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न त्यात आहे.’’

**४) डॉ. विटमरः** व्यक्तिच्या संदर्भात ज्या गंभीर अडचणी किंवा समसया उद्‌भवतात अशा समस्यांचे निर्मुलन करून संबंधित व्यक्तिंना मदत करणे म्हणजे समाजकार्य होय.

**साहित्याचा आढावा (Reviw of Literature)**

समाजकार्य शिक्षणात क्षेत्रकार्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. खऱ्या अर्थाने भारतात व्यावसायिक समाजकार्याची सुरूवात तशी १९३६ साली झाली. समाजकार्याच्या क्षेत्रकार्याचा शिक्षण आणि प्रशिक्षण आवश्यक असे संदर्भ सुची ग्रंथाची निर्मिती आवश्यक असते. तसे पाहता समाजकार्याच्या क्षेत्रकार्यासंदर्भात आजपर्यंत फार कमी प्रमाणास संशोधन करण्यात आलेले दिसून येते. नांदेड जिल्ह्यात अध्यापही समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य या विषयात संशोधकाने मागील संशोधनात समाजकार्य क्षेत्रकर्या संदर्भात निष्कर्ष मांडण्यात आले आहेत जे पाहूयात.

**Singh R.R.:** भारतातील समाजकार्याचे यशस्वीरित्या व्यावसायिकरण होण्यासाठी 'क्षेत्रकार्य' हा समाजकार्य शिक्षणाचा गाभा असून वर्गातील शिकविल्या जाणारा विषयास सैध्दांतिक ज्ञानास प्रत्यक्षात अवलंब करण्यासाठी आठवड्यातून दोन दिवस क्षेत्रकार्य करण्यासाठी देण्यात येते. तसेच क्षेत्रकार्य नियोजनात केलेली कृती असावी लागते ज्यात क्षेत्रकार्याचे नियोजन, आयोजन, संघटन, कुशल कार्यकर्त्याचे उपाययोजनात्मक संशोधन निष्कर्ष मांडले जाते.

Kaushile S.: अध्ययन आणि अध्यापानाची प्रक्रिया या शोध निबंधात क्षेत्रकार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले भूतकाळातील अनुभव, बुध्दीमत्ता, दृष्टीकोन व आवड यांची माहिती असतांना ते म्हणतात की, समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य हे क्षेत्रकार्याची संस्था, विद्यार्थी आणि पर्यवेक्षक या तीन घटकांवर अवलंबून असते.

Tikate K.: क्षेत्रकार्य प्रशिक्षणाचे घटक यांचे क्षेत्रकार्याचे घटक पाहत असतांना ते म्हणतात की, समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य हे क्षेत्रकार्याची संस्था, विद्यार्थ्यी आणि पर्यवेक्षक या तीन घटकांवर अवलंबून असते.

**Lawani, B.:** "Social Work Education & Filed Instruction" या शोध प्रबंध प्रमुख तीन प्रभागात विभागण्यात आलेला दिसतो. पहिला भागात समाजकार्य क्षेत्रकार्य बाबतीत ध्येय, उद्देश्य, घटक, संरचना, समाजकार्य क्षेत्रकार्य, शिक्षणाची गरज असते.

**समाजकार्याचा अर्थ (Meaning of Social Work):**

समाजकार्याच्या व्याख्येवरून असे दिसून येते की, समाजकार्य ही एक संघटीत व्यावसायिक सेवा आहे. मात्र समाजकार्याचा अर्थ त्यापेक्षाही व्यापक आहे. कारण समाजकार्याचा विकास सर्व देशात समान व एकसारखा असा झालेला नाही. आजही काही देशात समाजकार्य म्हणजे केवळ आर्थिक मदत एवढ्यापुरतेच मर्यादित आहे. तर काही देशात समाजकार्य हे व्यावसायिक सवेच्या स्वरूपात प्रचलित आहे. प्रो. क्लार्क यांच्या मते, फार थोड्या लेखकांनी समाजकार्याच्या व्याख्या व अर्थ स्पष्ट केला आहे. बहुतांशी लेखकांनी समाजकार्याचा इतिहास, कार्ये व प्रक्रिया यांचे विवेचन केले आहे तर काही लेखक समाजकार्य व समाजकल्याण यात काही फरक मानीत नाहीत. इतर व्यवसायांच्या तुलनेत समाजकार्य हा एक नवीन व्यवसाय असल्यामुळे त्याची वैशिष्ट्ये व अभ्यासविषय याबाबत वेगवेगळी मते असणे स्वाभाविक आहे. प्रो. क्लार्क यांनी समाजकार्याचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

- **सर्वसामान्य अर्थ (Meaning of Social Work):**

समाजकार्याच्या व्याख्येवरून असे दिसून येते की, समाजकार्य ही एक संघटीत व्यावसायिक सेवा आहे. मात्र समाजाकार्याचा अर्थ त्यापेक्षाही व्यापक आहे. कारण समाजार्याचा विकास सर्व देशात समान

व एकसारखा असा झालेला नाही. आजही काही देशात समाजकार्य म्हणजे केवळ आर्थिक मदत एवढ्यापुरतेच मर्यादित आहे. तर काही देशात समाजकार्य हे व्यावसायिक सेवेच्या स्वरूपात प्रचलित आहे. प्रो. क्लार्क यांच्या मते, फार थोड्या लेखकांनी समाजकार्याच्या व्याख्या व अर्थ स्पष्ट केला आहे. बहुतांशी लेखकांनी समाजकार्याचा इतिहास, कार्ये व प्रक्रिया यांचे विवेचन केले आहे तर काही लेखक समाजकार्य व समाजकल्याण यात काही फरक मानीत नाहीत. इतर व्यवसायांच्या तुलनेत समाजकार्य हा एक नवीन व्यवसाय असल्यामुळे त्याची वैशिष्ट्ये व अभ्यासविषय याबाबत वेगवेगळी मते असणे स्वाभाविक आहे. प्रो. क्लार्क यांनी समाजकार्याचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

- **सर्वसामान्य लोकांचा दृष्टीकोन:**

एखादी व्यक्ति सर्वसामान्य व काही चांगले काम करीत असेल तर ती सामाजिक कार्यकर्ता आहे असे सर्वसामान्य लोक मानतात. तरीसुध्दा सामाजिक कार्य करणारी एखादी व्यक्ति आणि कल्याणकारी कार्य करणारी व्यक्ति यामध्ये फरक केला जातो. कल्याणकारी कार्ये करणाऱ्या लोकांना त्यासाठी वेतन मिळते. ते दानशुर व धार्मिक व्यक्तिंचा आदर करतात. मात्र जे लोक दानशूर लोकांच्या सहानुभुतीवर आपली उपजिविका करतात अशा गरीब लोकांचा ते तीरस्कार करतात. सर्वसामान्य लोकांच्या मनात उदार व दानशुर लोकांबद्दल आदराची भावना असते. मात्र ते समाजकार्य व समाजकल्याण यात कमी जास्त असा फरक मानीत नाहीत.

- **अर्धव्यावसायिक अर्थ:**

समाजकल्याणाची कार्ये करणाऱ्या संस्थेत काम करणाऱ्या अप्रशिक्षित व्यक्तिंच्या दृष्टीने समाजकार्य हे त्यांच्या चरितार्थाचे साधन असते. त्यांच्या मते, अशा कल्याणकारी संस्थेत सेवा करणारे लोक सामाजिक कार्यकर्तेच असतात कारण ते समाजकल्याणाच्या कार्यात गुंतलेले असतात. प्रो. क्लार्क यांनी याबाबत असे व्यक्त केले आहे की, ज्या अनेक व्यक्ति मोठ्यामोठ्या संस्थात काम करतात त्या समाजकार्यकर्तेच असल्या पाहिजेत असे नाही. कारण त्या व्यक्ती घरकाम, मनोरंजन, रूग्णसेवा, सामाजिक विमा, हिशेब, लेखा या विषयातील तज्ज्ञ असू शकतात. तसेच व्यक्तिला व्यावसायिक व्यक्ति बनविणारी तत्त्वे कोणती असतात याचाही विचार केला पाहिजे, कारण आई जेव्हा आपल्या आजारी मुलाची शुश्रूषा करते तेव्हा ती डॉक्टर असते असे नाही. कारण व्यवसायांबद्दलचे विशिष्ट ज्ञान याबरोबरच दक्षता आणि नैतिकताही त्यात समाविष्ट असते.

- **शास्त्रीय अर्थ:**

डॉ. हेलन विटमर हिने समाजकार्याबद्दल असे म्हटले आहे की, अडचणीत, संकटात असलेल्या व्यक्तिंना मदत करणे हा समाजकार्याचा उद्देश आहे, अशी मदत संघटित समुहांच्या सेवेद्वारे केली जाते किंवा अशा व्यक्तींना त्या समूहाचा सदस्य म्हणून घेऊन समुहाद्वारे त्यांच्या समस्या सोडविल्याजातात. असे समुह म्हणजे कुटुंब, शेजारी, शाळा, दवाखाने, करमणूक केंद्रे, राज्य, राष्ट्र आणि लोकांच्या सहाय्याने चालवणाऱ्या संस्था होत. डॉ. हेलन विटमर समाजकल्याणकारी अशा सर्व संस्थांना समाजकार्याच्या पातळीवरून मदत करीत असतात.

- **व्यावसायिक अर्थः**

व्यावसायिक समाजकार्य म्हणजे विशिष्ट विचारांनी दृष्टिकोणांनी, सिध्दांतानुसार वागून विशिष्ट भावनांनी मदत देण्याचे कार्य करणे होय. ही मदत देण्याचे निश्चत उद्देश असल्यने विशेष पध्दतीने देण्यात आलेल्या पध्दतीमुळे, विशेष असे परिणाम साधने शक्य होते. सेवा देणाऱ्याजवळ समाजकार्याची, मानव समाजाचे सहसंबंधांचे ज्ञान असणे गरजेचे असते. सेवेचा आधार लोकशाही विचारप्रणाली असून ही सेवा व्यावसायिक, कायम स्वरूपता प्रभाव साधणारी, काम करण्याची विशिष्ट पध्दत असणारी असावी.

**समाजकार्याची नितीतत्त्वे (Principles of Social Work)**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात काही मूलतत्त्वे व नैतिक नियम मान्य करण्यात आले त्यावर समाजकार्य प्रत्यक्ष व्यवहारात कार्यरत आहे. ही मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१. व्यक्तिचा धर्म, दर्जा, जात व राजकीय विचार आणि स्वभाव यावर अधिक भर देण्याऐवजी एक मानव म्हणून व्यक्तिकडे पाहणे आणि व्यक्तिचा गौरव, सन्मान, चारित्र्य व स्वाभिमान वृधिंगत करणे.

२. व्यक्ति, समूह आणि समूदाय यांच्यामध्ये असलेल्या भित्त्वाकडे आदराने पाहणे आणि त्यांच्यात समन्वय वाढवून त्यातून समुदायिक कल्याण साधणे.

३. व्यक्तिमध्ये स्वावलंबनाची भावना वाढविण्यासाठी शक्ती व प्रोत्साहन देणे, ज्यामुळे व्यक्तिंचा आत्मविश्वास वाढेल आणि व्यक्ती आपल्या जबाबदाऱ्या पार पाडू शकतील.

४. व्यक्ति, समूह आणि समुदाय यांना आपत्ती काळात, संकटकाळात अशी मदत करणे ज्यामुळे त्यांचे जीवन सुसह्य होईल.

५. समाजकार्याचे ज्ञान व तत्त्वज्ञानावर आधारित निती नियमांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची व्यावसायिक जबाबदारी स्विकारणे, ज्यामुळे व्यक्तिंना आपल्या अपेक्षा व गरजांची पूर्तता करण्यासाठी चांगले वातावरण आणि कालावधी प्राप्त होईल आणि त्यांना आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करता येईल व ते समाधानी राहतील.

६. व्यावसायिक संबंधातील गुप्तता सांभाळणे.

**समाजकार्याची नितीतत्त्वे**

प्रथा, सवयी असा नितितत्वे याचा अर्थ होतो. काही तज्ञ यांना बाहेरून लादलेली बंधने मानतात. नितितत्वे माणसाचे शील, चारित्र्य, स्वभाव व वृत्ती कशा असाव्यात याबद्दल सांगतात. वर्तणूक, सभ्यता, संस्कृती, संस्कृतपणा याबद्दल मार्गदर्शन करतात. निती हे ज्ञान आहे. ते कृतींना मार्गदर्शन करतात. थोडक्यात, नितीतत्त्वाची बंधने जेव्हा पाळली जातात तेव्हाच नीतीतत्त्व प्रत्यक्षात उतरले जाते. नीतितत्त्वामध्ये नैतिक तत्त्वज्ञान व नैतिक आदर्श यांचा अंतर्भाव होतो. म्हणूनच रूपांतरीत नीतितत्त्वे, आदर्श नमुना प्रस्तुत करणारी नीतितत्त्वे, वर्णनात्मक नितितत्त्वे असे तीन प्रकार पहावयास मिळतात. नैतिक तत्त्वज्ञान हे वेळोवेळी रचले जाते तरी काही तत्त्वज्ञाना त्रिकालबाधित असते. ती आदर्श व अढळ असतात तीशच ती शाश्वत असतात.

नितीतत्त्वांची समाजकार्याला एक व्यवसाय म्हणून समाजात दर्जा मिळवतांना गरज आहे. सतत निर्णय घेतांना व उद्भवणारे पेच सोडवितांना नीतिमूल्यांच्या मार्गदर्शनाची गरज असते. भारतातील

व्यावसायिक सामाजकार्याने आचारसंहिता स्विकारून वेळोवेळी त्याप्रमाणे बदल केले आहेत, यातूनच १९९७ साली नितीतत्त्वे पुढील मुद्यांवरून भर देतात.

१. मानवा, मानवाचे महत्त्व.

२. मानवाच्या महत्तेला उच्चतम स्थान.

३. प्रत्येककात आपले आयुष्य जगण्याची उपजत क्षमता.

४. निर्णय व निदान यात सहभाग असा सहभाग हा प्रत्येकाचा अबाधित आधिकार असतो.

IFSW व IASSW या आंतरराष्ट्रीय संघटनांनी नीतितत्त्वांच्या बांधणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अशा नीतितत्त्वाची गरज भारतात जाणवू लागल्यनंतर १९९१ पासून त्या दिशेने प्रयत्न सूरू झालेत. १९९७ साली ASSWI ने या नितीतत्त्वांना पुरस्कृत केले ते खालीलप्रमाणे आहेत.

अ. स्वतःत व्यवसायात आणि समाजात मूल्यांचा पुरस्कार करण्याची शपथ समाजाकर्यकर्ते घेतात.

आ. स्वतः प्रती व व्यवसायाप्रती नैतिक मूल्यांना पुरस्कार करण्याची शपथ समाजकार्यकर्ते घेतात.

इ. गरजू व शोषितांप्रती नैतिक जबाबदारी.

ई. समाज हा राज्य यांच्याप्रति नैतिक जबाबदार.

उ. सहकार्यकर्ते व काम देणाऱ्या संघटनेप्रति नैतिक जबाबदार.

ऊ. समाजकार्य शिक्षण व संशोधनाप्रति नैतिक जबाबदारी.

**सारांशः-**

समाजशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. परंतु अनेक लोकांची सामाजिक कार्याची समाजशास्त्राशी सांगड घालताना संभ्रमावस्था होते. कारण समाजकार्याचे कार्य हे थोडे वेगळे कार्य आहे. समाजशास्त्रामध्ये मानवी प्राण्यांच्या एकमेकांशी होणाऱ्या आंतरक्रियांचे परिक्षण केले जाते. तसेच मोठ्या समाजाशी वर्तनाचे संघटन कसे साधले जाते हे पाहिले जाते. उत्तर समाजकायर्जत समाशास्त्रातील माहितीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. समाजकार्य हा असा एक पेशा आहे ज्यासमध्ये मदत करणाऱ्या लोकांची माहिती मदत करण्यासाठी पुरविली जाते. थोडक्यात, समाजशास्त्राने निर्माझ केलल्या ज्ञानाचा उपयोग समाजकार्याचे प्रमाण व गुणवत्ता वेगवेगळया देशात एकसारखी असू शकत नाही. कारण त्यांच्या लोकसंख्येत फरक असतो. त्या देशांचा विकासाचा टप्पा, आर्थिक सशांधने ज्यांना सेवा पुरवावयाच्या आहेत त्या ग्राहकांची संख्या व त्यांची व्याप्ती, शासन प्रकार व त्यांची धोरणे, लोकांच्या गरजा व आकांक्षा, त्यांच्या संघटनांचे स्वरूप समाजकल्याण कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी लागणारा प्रशासकीय लवाजमा व संघटनात्मक उपलब्धता यावरही ते कार्यक्रम ठरत असतात.

**संदर्भ सूचीः-**

१. Choudhari D. Paul – Introduction to Social Work, Atmaram and Sons, 1964.

२. Divekar V.D. (Vled) – Social Reform Movement in India, Historical Perspective, Sangam Books, London-91

३. भांडारकर पु.ल., वैद्य समाजशास्त्रीय सिध्दांत, विद्या प्रकाशन, नागपूर -१९७१.

४. भागवत विद्युत, स्त्री-प्रश्नाची वाटचाल, पुणे, प्रतिमा प्रकाशन, २००४.

५. टांकसाळे डॉ. प्राजक्ता, व्यावसायिक समाजकार्य विचारधारा व इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००७.

६. साळवेकर डॉ. संजय, समाजकार्य-पध्दती, क्षेत्र, विचारधारा व समाजसुधार, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१५

७. Arthur E. Fink: The field of Social Work, Holt Rinehart and Winston, New York.

8. Dasgupta Sujata: Towards a Philosophy of Social work in India, Popular Book Services for the Gandhian Institute of Studies.

9. Gangarde K. G. Radha Publication, New Delhi.

10. Mathew Grace: An Introduction to Social Case Work, Tata Institute of Social Sciences, Bombay.

11. Toselano R. W.: An Introduction to Group Work Practice.

12. V. G. Mhetras: Understanding Social Case Work.

* * *

# स्थलांतर आणि एकल महिला ऊसतोड कामगार

***डॉ. नजीर जब्बार शेख***
प्राध्यापक
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

***कामिनी आशा हिरामण पवार***
संशोधिका
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

**सारांश —**

ऊसतोडीचे अतिशय जोखमीचे आणि अवघड काम एकल महिला करतात, यांनाच 'अर्धा कोयता' असे संबोधले जाते. ऊसतोडी करण्यासाठी आपल्या स्थानिक गावापासून किंवा जिल्ह्यातून पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक अशा ठिकाणी जास्त प्रमाणात ऊसतोड महिला कामगारांचे हंगामी स्थलांतर होते. हे हंगामी स्थलांतर जितके वेदनादायी आहे तितकेच असुरक्षित सुद्धा असते. अर्ध्या कोयत्याने काम करणा-या या एकल महिलांच्या स्थलांतरणामुळे कुटुंबातील अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक नुकसान होत असते. सदरील शोधनिबंधात एकल ऊसतोड महिला कामगारांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या कुटुंबावर होणारे विपरित परिणाम अभ्यासण्यात येणार आहेत.

**शब्द संकेत —** स्थलांतर, एकल महिला, ऊसतोड कामगार, अर्धा कोयता, शैक्षणिक गळती, बालविवाह इ.

**प्रस्तावना —**

मानवी जीवनाचा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक म्हणजे स्थलांतर होय. स्थलांतरम्हणजे मानव किंवा मानवी समुहाचे एका ठिकाणापासून दुस-या ठिकाणावर जावे आणि वास्तव करणे होय. स्थलांतर हे शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि हंगामी कामासाठी केले जाते. स्थलांतरामध्ये हंगामी स्थलांतर हे विस्कळीत स्वरूपाचे असते. हंगमी स्थलांतर हे ठराविक काळापुरते विशिष्ट विभागात केले जाते. स्थलांतरहा मानवी जीवनावर साधक—बाधक स्वरूपाचा परिणाम करणारा घटक आहे.

ऊसतोडणी हे काम विशिष्ट पद्धतीने आणि जोखीम घेवून केले जाणारे काम आहे. ऊसतोडीसाठी बीड जिल्ह्यातील जवळ—जवळ सर्वच तालुक्यांमधून स्थलांतरकेले जाते. यामध्ये अर्ध्या कोयत्याचे काम करणा-या एकल महिला ज्यावेळी आपले घर सोडून स्थलांतरित होतात, तेव्हा त्यांच्या अपत्यांची शैक्षणिक आणि सामाजिक गतिशिलता मंदावते. शैक्षणिक गळती होते. किशोरवयीन मुलींच्या सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण होतात. म्हणून ऊसतोडीसाठी हंगामी स्थलांतर करण्यापूर्वी बालविवाह झाल्याचे किंवा करण्याचे प्रयत्न झाल्याच्या घटना बीड जिल्ह्यात सर्वत्र आढळून येतात.

यामुळे सदरील शोधनिबंधात एकल ऊसतोड महिलांच्या स्थलांतराचा व या स्थलांतरामुळे त्यांच्या कुटुंबावर होणा-या विपरित परिणामांचा अभ्यास करण्याता आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये—**

१. हंगामी स्थलांतरामुळे एकल महिला ऊसतोड कामगारांच्या अपत्यांवर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

२. ऊसतोडीसाठी होणा-या हंगामी स्थलांतरामुळे एकल महिलांच्या कुटुंबात होणा-या बालविवाहाची कारणे अभ्यासणे.

**गृहितके —**

१. एकल महिला ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या अपत्यांची शैक्षणिक गळती झालेली आढळून येते.

२. ऊसतोडीसाठी होणा-या स्थलांतरामुळे एकल महिलांच्या कुटुंबात बालविवाह झालेले आढळून येतात.

**संशोधन पद्धती व तथ्य संकलन —**

संशोधिकेने सदरील शोधनिबंधासाठी व्यष्टी अध्ययन या गुणात्मक संशोधन पद्धतीचा व दुय्यम तथ्य संकलन स्रोतांचा उपयोग केला आहे. या शोधनिबंधासाठी सहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर करून बीड तालुक्यातील पाच महिलांची निवड करण्यात आली आहे. या शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी विविध संस्थांचे अहवाल, अभ्यासपूर्ण लेख, बातम्या, वृत्तपत्रे, पुस्तके व संदर्भ ग्रंथ इ. वापरलेले आहेत.

**व्यष्टी अध्ययन क्र. १ —**

सुमनचे लग्न वयाच्या १४व्या वर्षी झाले. आई—वडील ऊसतोडीचे काम करत होते. त्यांचे लग्नही ऊसतोड कामगार कुटुंबात करण्यात आले. त्यांचे शिक्षण ६वी पर्यंत झालेले आहे. लग्नानंतर आजपर्यंत त्या ऊसतोडीचे काम करत आहेत. व्यसनाधिन नव-याने वयाच्या ३०व्या वर्षीच साथ सोडली. एका रस्ता अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर सुमनवर दोन मुली, एक मुलगा आणि सासू यांच्या पालनपोषणाची जबाबदारी आली. गावात रोजगार उपलब्ध नाहीत. शेतीही नाही. मग, जीवन जगण्यासाठी अर्थार्जन कसे करायचे तर पर्याय होता ऊसतोडीच.

सुमन आपल्या मुलाला सोबत घेऊन पाच वर्षांपासून ऊसतोडीचे काम करत आहे. त्याचे शिक्षण बंद झाले आहे. तो ८वी पर्यंतच शिकला आहे. दोन्ही मुलींचे शिक्षण बंद करून लग्न करण्यात आले. त्यांना मुलं—बाळं आहेत. त्याही ऊसतोडीचे काम करतात. सुमन म्हणते, तीन पिढ्यांपासून ऊसतोडीचे काम चालू आहे. हे चक्र कधी थांबेल माहीत नाही.

**व्यष्टी अध्ययन क्र. २ —**

हिरा ही आज ३७ वर्षांची एकल ऊसतोड महिला कामगार आहे. तिचा पती हा टोळीचा मुकादम होता. वयाच्या १२व्या वर्षी लग्न, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आणि वयाच्या २३व्या वर्षापासून आलेले विधवा म्हणून जगणे. लहान मुलांना आई—वडिलांकडे ठेवून मुले थोडी मोठी होईपर्यंत ऊसतोडीसाठी प्रत्येक वर्षी स्थलांतर केले.

दोन्ही मुलांना सातवी—आठवीपर्यंत शिकवून लग्न कूरन करून दिले. लहान मुलगा, मुलगी शिकत आहेत. पण त्यांनाही ती कारखान्याला जाताना आता सोबत घेऊन जाते. कारण त्यांना कोणाकडे ठेवायचे हा खूप मोठा प्रश्न तिच्यासमोर आहे. ऊसतोडीमुळे लेकींचा

तिच्यासारखाच बालविवाह करावा लागला. शिक्षणाला खंड पडला. इतर दोन लेकरांची पण ऊसतोडीच्या हंगामामध्ये सहा महिने शाळा बुडते. पण, रोजगाराचा आणि उदरनिर्वाहाचा पर्याय नसल्याने आजही ऊसतोडीच करत आहे.

**व्यष्टी अध्ययन क्र. ३ —**

सुनिता ही ऊसतोड कामगार कुटुंबातीलच मुलगी, लग्नही ऊसतोड कामगार कुटुंबातच झाले. जमीन तशी कोरडवाहू स्वरूपाची दोन एकरभर पण, ती सास-याच्या नावाने होती. सुनिता हिचा देखील बलविवाहचं झाला होता. नवरा व्यसनी होता. उचल घेवून अर्ध्ये पैसे दारूच्या व्यसनामध्येच जात असत. एका हंगामाची उचल घेऊन हॉटेलवरून जेवण करून येत असताना मोटारसायकलचा अपघात होऊन जगीच ठार झाला.

सुनिताला दोन मुले घेऊन ऊसतोडीचे काम करावे लागले. मुले लहान होती तोपर्यंत मुलांना सोबत घेऊनच ती ऊसतोडीसाठी स्थलांतरकरत होती. एका मुलाचे शिक्षण ती सातवीनंतर सुटले. तो मुलगा आता आईसोबत ऊसतोडीचे काम करतो. परंतु, आई—मुलाने लहान मुलाला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. लहान भाऊ खूप शिकावा, त्याला नोकरी लागावी यासाठी मोठा भाऊ आईसोबत ऊसतोडी करत आहे.

**व्यष्टी अध्ययन क्र. ४ —**

राधा ही सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील वडिलांच्या निधनानंतर दहावीचे शिक्षण थांबवून तिला आत्याच्या घरी सून म्हणून देण्यात आले. सासर आत्याचे घर असल्याने तिने दहावीची परीक्षा दिली. पास झाली. पण, पुढेच शिक्षण घेतले नाही. नवरा एका हाताने अपंग असल्याने त्याला दुसरे काम करता येत नव्हते. काही वर्षांनंतर कुटुंब विभक्त झाले. मुले, पती आणि राधा असे कुटुंब मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करू लागले. पण, कोरोनामध्ये पतीचे निधन झाले आणि राधाचा संसार उघडा पडला.

दोन एकर गायरान शेती होती. पण, त्यामध्ये काय उत्पन्न घेणार. लोकांचे झालेले कर्ज कसे फेडणार म्हणून राधा ऊसतोडीसाठी स्थलांतर करू लागली. एक मुलगा आणि एक मुलगी आजीकडे राहत असत. पण, चुलती आई इतर भावंडांकडून त्यांना चांगली वागणूक मिळत नव्हती. म्हणून राधा त्यांना आपल्या सोबत घेऊन ऊसतोडी करू लागली. वारंवार झालेल्या स्थलांतरामुळे मुलांना शिक्षण घेण्यात गोडी राहिली नाही. मुलगा आता शाळेत प्रवेशित असूनही शाळेत जात नाही. मुलगी आईला ऊसतोडीच्या कामात मदत करते.

स्थलांतरामुळे दोन्ही मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

**व्यष्टी अध्ययन क्र. ५ —**

अमिना बी ही मुस्लीम महिला. घरात आठराविश्व दारिद्र्य. लग्न करून सासरी आली तेव्हा चार दीर, दोन नंदा आणि सासू—सासरे असा भला मोठा परिवार. जमीन नाही आणि पक्कं घरही नाही. सासरा भंगारचे काम करी, तर सासूबाई बांगड्या भरत असे. पण एवढा मोठा परिवार सांभाळणे आणि त्यांच्या गरजा भागविणे कठीणच होत असते.

नव-याला अपंगत्वामुळे काम होत नसे. त्यामुळे मुले—बाळे झाल्यावर अमिनाने घराबाहेर पडून ऊसतोडीचे काम करण्याचा निर्णय घेतला. ती नव-याला आणि मुलांना सोबत घेऊन ऊसतोडीसाठी स्थलांतर करायची. पण, काम हे एकटीच करायची. घरचे सगळे पाहून तिला आपल्या बाहेरच्या कामासाठी इतर सहकारी कामगारांची मदत घ्यावी लागत असे. यातून नवरा तिच्यावर संशय घेऊ लागला. मारहाण करू लागला. घर सोडून जा म्हणून त्रास

देऊ लागला. या अशा वागण्यामुळे तिने मुलीला शिकवलेच नाही. आणि १३ वर्षाची मुलगी झाली की भावाच्या मुलाशी तिचा निकाह केला. आजही नव-याचा त्रास सहन करत इतर मुलां—बाळांच्या उदरनिर्वाहासाठी अमिना एकटी अर्ध्या कोयत्याने ऊसतोडी करते.

**तथ्य संकलन —**

उसतोडीसाठी स्थलांतरकरणा-या एकल महिला ह्या विवाहित, विधवा, परित्याक्त्या किंवा कुमारी सुद्धा असतात. सर्वसाधारण ३० ते ४५ वयोगटातील या महिलांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्याची शैक्षणिक गळती होती. काही पाल्य शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडतात.

वारंवार होणा-या स्थलांतरामुळे किशोरवयीन मुलींच्या संरक्षणाची समस्या असते. त्यामुळे त्यांचा बालविवाह लावून दिला जातो. कुटुंबातील इतर सदस्यांकडून त्यांच्या वैयक्तिक जीवनावर टीका टिपण्णी केली जाते.

**निष्कर्ष —**

१. एकल महिला ऊसतोड कामगार महिलांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या अपत्यांची शैक्षणिक गळती होत.

२. एकल महिला ऊसतोड कामगार महिलांची मुले आपल्या मूलभूत शैक्षणिक हक्कापासून वंचित राहतात.

३. एकल ऊसतोड महिला कामगारांच्या कुटुंबांत बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे.

**शिफारशी —**

१. एकल ऊसतोड महिला कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी साखर कारखान्यानंतर शाळा वर्गाची व्यवस्था साखर आयुक्तालयाकडून करण्यात यावी.

२. एकल ऊसतोड महिला कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी उच्च दर्जाचे आणि संरक्षित असे हंगामी वसतिगृहे गावपातळीवर असावित.

३. एकल ऊसतोड महिला कामगारांच्या कुटुंबातील विवाह रोखण्यासाठी गावपातळीवर बालविवाह प्रतिबंधात्मक चोख व्यवस्था व यंत्रणा असावी.

४. प्रत्येक वर्षी किशोरवयीन मुलींची शाळेतील संख्या कमी होण्याच्या कारणांचा सखोल अभ्यास शासन स्तरावर होणे गरजेचे आहे.

५. एकल ऊसतोड महिला कामगारांच्या कुटुंबात बालविवाह होऊ नयेत यासाठी पालकांना प्रोत्साहन पर बक्षिसे घोषित करावीत.

**संदर्भ ग्रंथसूची —**

१) International Institute for Population Sciences (IIPS) and ICF 2018, National Family Health Survey (NFHS-4), India 2015-16, Maharashtra, Mumbai IIPS.

२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०२२, बीड जिल्हा.

३) मिळून सा-याजणी — सप्टेंबर २०१८,

४) https://divyamarathi.bhaskar. com — दुर्दैव

५) INDIE JOURNAL.in उसतोडणी कामगारांच्या प्रश्नांवरून बीड जिल्ह्याचे राजकारण बदलण्याचे संकेत, २०१८

६) https://www.deshdoot.com,Sarvamat – उसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित, Published 20th Nov. 2022.

.७) Rom divyamarathi.bhaskar.com – उसतोड कामगारांच्या विद्यार्थ्यांचा राहण्याचा व शिक्षणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न.

८) https://marathi.abalive.com, news – उसतोड कामगारांच्या मुलांच्या हातातही कोयताच, शिक्षणाचं काय

९) UGC Care Listed Journal, ISSN 2231-573 X – साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण – MAH MAR 34737/13/11 2009-TC, अंक तिसरा ऑक्टो, नोव्हें, डिसेंबर २०२२, ऊसतोड कामगार विशेषांक भाग –२, संपादक –डॉ. शिवाजी हुजे.

१०) https://baimanus.in Story of Women – ऊसतोड कामगारांची व्यथा की परवड

११) https://www.lokmat.com – ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृहे, गळती रोखण्यासाठी महत्त्वाचे

१२) https://www.maxmaharashtra.com – ऊसतोड कामगारांची मुले शाळांऐवजी उसाच्या फडात.

१३) marathi.timesnownews.com, Update June 18, 20, 23 – ऊसतोड कामगार म्हणून ओळख असणा-या बीड जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण अधिक, धक्क्कादायक आकडेकवारी आली समोर.

* * *

# वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांना समायोजनात येणाऱ्या अडचणी व आरोग्याच्या समस्यांचा अभ्यास

**डॉ. नजीर जब्बार शेख**
संशोधक मार्गदर्शक
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, संशोधन केंद्र, अंबाजोगाई

***पवन सोमनाथअप्पा गिरवलकर***
संशोधक विद्यार्थी
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, संशोधन केंद्र, अंबाजोगाई

**प्रस्तावना :-**

भारतात 16 व्या शतकात वृद्धांची समस्या नव्हती. 20 व्या शतकात मात्र देशात वृद्धांची समस्या निर्माण झालेली आढळून येते. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया इत्यादी देशात 18 व्या शतकापासूनच वृद्धांची समस्या आहे. वर्तमान काळात आपल्या देशात वृद्धांच्या समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहेत. भारतातील कुटुंब संस्था ही संयुक्त पद्धतीची असल्यामुळे वृद्धांची समस्या निर्माण झाली नव्हती. संयुक्त कुटुंब पद्धतीत वृद्धांना आदराचे स्थान असते. तसेच वृद्ध माता-पितांचा संभाळ करणे हे मुलांचे आवश्यक कर्तव्य मानले जाते. परंतु औद्योगिकीकरण, नागरिकरण व आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचा -हास होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. नागरी समाजात प्रामुख्याने विभक्त कुटुंब पद्धती आढळून येते. ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंब पद्धतीवर देखील आघात होऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. परंतु ग्रामीण भागात आजही संयुक्त कुटुंब पद्धतीचा विशेष प्रभाव आहे. संयुक्त कुटुंब पद्धती संपूर्ण देशात अस्तित्वात होती तोपर्यंत वृद्धांची समस्या निर्माण झाली नव्हती. परंतु संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आल्याबरोबर वृद्धांची समस्या निर्माण झालेली आढळते. ज्याप्रमाणे शहरी भागात वृद्धांचे समस्या निर्माण झाली त्याचप्रमाणे ग्रामीण भागात देखील वृद्धांची समस्या दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने मुलं शहरात स्थायिक झाली. घरांची समस्या, जागेचा प्रश्न, शहरातील वाढता खर्च इत्यादी कारणांमुळे वृद्ध आई-वडिलांना शहरात आणणे शक्य नसते. ते खेड्यातच राहतात. मुलं आपल्या पत्नी व मुलांसह शहरात राहतात. खेड्यातील वृद्ध आई-वडिलांकडे मुलांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे ग्रामीण भागात सुद्धा वृद्धांचे समस्या आढळून येते.

**वृद्धावस्थेची संकल्पना :**

वृद्ध कुणास म्हणावे? हा तसा एक विवाद्य प्रश्न आहे. सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते A Man is as old as he thinks याचाच अर्थ जेव्हा माणसाला वाटते की आपण वृद्ध झालो तेव्हा त्याला वृद्ध म्हणावे. हा अर्थ योग्य नाही. पाश्चात देशात मागील शतकापासूनच वृद्धांच्या संदर्भात अध्ययन करण्यात आले आहे. वृद्धांच्या समस्या बाबत अध्ययन करणारे एक स्वतंत्र शास्त्र विकसित झाले आहे. या शास्त्राला Gerontology वार्धक्यशास्त्र किंवा वृद्धापकाळचे शास्त्र (Science of Old Age) असे म्हणतात.

वृद्धापकाळचे शास्त्र किंवा वार्धक्यशास्त्र हे आधुनिक असले तरी वृद्धांच्या संदर्भात प्राचीन काळापासून विचार केला असल्याचे आढळून येते.

शरीराच्या विविध घटकांची झीज झाली की, वार्धक्य येते असा विचार आयुर्वेदात मांडण्यात आला आहे. शरीराच्या घटकांची गुणवत्ता वाढवून तारुण्य टिकविण्यासाठी आयुर्वेदात रसायनिक चिकित्सा सांगितली आहे. इ.स.पूर्वी 1600 मध्ये पॅपिरस मध्ये वृद्धांचे तरुणांमध्ये रूपांतर करण्याचा उपचार सांगितला आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राचा पिता असे ज्याचे यथार्थ वर्णन केले जाते तो हिपोक्रॅटिस (इ.स.5 वे शतक) वृद्धत्वांची तुलना शिशिर ऋतुशी करीत असे. वृद्धांना होणाऱ्या मोतिबिंदू, संधिवात इत्यादी विकारांचे वर्णन केले आहे.
रिस्टॉटलच्या मते, प्राण्याच्या शरीरात एक प्रकारची उष्णता असते व वाढत्या वयाबरोबर ती कमी होत जाऊन वृद्धत्व व मृत्यू येतो. तेराव्या शतकात रॉजर बेकनन वृद्धांच्या आरोग्यावर एक पुस्तक लिहिले होते. वार्धाक्यातील विकारांवर पहिला शास्त्रीय ग्रंथ 1840 मध्ये लिहिण्यात आला. या शतकाच्या सुरुवातीला नेश्चॉर या अमेरिकन डॉक्टरने या विषयाच्या अभ्यासाला विशेष चालना दिली. 1612 मध्ये नेश्चॉर यांनी न्यूयॉर्कला वार्धाक्यातील विकाराचा अभ्यास करण्यासाठी एक संस्था स्थापन केली. Geriatrics या विषयावर त्याचा ग्रंथ मान्यता पावला आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा :**

**पद्माकर नागापूरकर (2003) :** यांच्या वृद्धत्वाची शान या पुस्तकामध्ये वृद्धांच्या आरोग्याच्या समस्या विषयी सांगितले आहे. पाश्चात्य देशात प्रगत, आर्थिक स्वंयपूर्णता असलेले औद्योगिकीकरण झालेले. त्यामुळे अर्थकरण शेतीवर अवलंबून नाही. शेती आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाते. जमीनही छोटे तुकडे केलेली जास्त नाही. शेतीवर लहान खेडी म्हटल्यावर आपल्या डोळयांसमोर जे चित्र दिसते तशी खेडी तिकडे नाहीत. संपन्न शहराची छोटी आवृत्ती तेवढेच तरीपण व्यक्ती स्वातंत्र्यामुळे कुटूंब विभाजन व एकटेपणा ही समस्या असतेच.

सेन व सर्व (२००१९) – ज्येष्ठ रहिवाशांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी ज्येष्ठ राहण्याच्या सुविधा तयार केल्या जातात; तथापि, त्यांच्या दैनंदिन जीवनात अनेक आव्हाने उद्भवू शकतात. सेन आणि इतरांनी केलेला अभ्यास. ज्येष्ठ रहिवाशांच्या वातावरणात वृद्ध व्यक्तींना भेडसावणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी समस्या सोडवण्याची प्रभावी धोरणे समजून घेण्याचे आणि त्यांचा सराव करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सामान्य आव्हानांमध्ये सामाजिक अलगीकरण, संवादातील अडथळे आणि मानसिक त्रास यांचा समावेश होतो. प्रभावी हस्तक्षेप म्हणून वैयक्तिक काळजी योजना, सामुदायिक उपक्रम आणि नियमित संवाद वाहिन्यांची अंमलबजावणी सुचवण्यात आली आहे.

शर्मा आणि पटेल (2020) वृद्ध व्यक्तींना अनेकदा आरोग्याशी संबंधित विविध समस्यांना सामोरे जावे लागते ज्यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक असते. यांनी केलेल्या सर्वसमावेशक अभ्यासात ज्येष्ठ रहिवाशांच्या सुविधांमध्ये आरोग्य जागरूकता आणि सक्रिय उपायांना प्रोत्साहन देण्याच्या महत्त्वावर भर देण्यात आला. या संशोधनात वृद्धांमधील दीर्घकालीन आरोग्याच्या स्थितीची व्याप्ती अधोरेखित केली गेली आणि नियमित आरोग्य तपासणी, वैद्यकीय सुविधांची उपलब्धता आणि ज्येष्ठ रहिवाशी समुदायांमध्ये अनुरूप आरोग्य सेवांच्या तरतुदीवर भर देण्यात आला.

**उद्देश :**

1. वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांना समायोजनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
2. वृद्धांना येणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन हे गुणात्मक स्वरूपाचे असून, संशोधनाकरिता व्यष्टी अध्ययन पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधन विषयास अनुसरून व्यष्टी करिता उद्देशपूर्ण नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून फक्त एका एककाची निवड करण्यात आली. संशोधनासाठी निवडलेल्या एकका बरोबर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मुलाखत मार्गदर्शिका तय्यार करून तथ्य संकलन केले. प्रस्तुत व्यष्टी ची मांडणी करतांना मुलाखत अनुसूची, निरीक्षण व चर्चा या माध्यमातून मिळालेल्या तथ्यावर आधारित केली आहे.

**व्यष्टी अध्ययन :**

**सुमित्रा भिसे, वय ७० वर्ष,** या परळी येथे राहणाऱ्या आहेत. त्यांना स्वतःचे घर ना दार, शेती ना मुले कोणीही नाही. अशा या सुमित्रा भिसे आहेत. या परळीला वैजनाथ मंदीरापाशी या दररोज बसुन जेवढे काही मागुन येते तेवढयात भागवत असत.

सुमित्रा भिसे यांची पुर्वीची स्थिती ही अत्यंत चांगली होती. पण कालांतराने त्यांचा नवरा वारला त्यांना कोणीही अपत्य नसल्यामुळे त्यांची जमीन, घर पाहुण्यातील कोणीतरी घेतले असे त्या सांगत होत्या. त्यानंर त्यांचा कोणीही सांभाळ करत नसल्याने त्या मागुन खात होत्या. येतील तेवढया पैशात त्या त्यांचा घरखर्च करत असत. पण असेच एके दिवशी त्या मंगत असतांना त्या चक्कर येऊन पडल्या व त्यानंतर त्यांना शेजारील लोकांनी उचलून दवाखान्यात नेले व औषधोपचार केले. त्या काही दिवस तेथे राहिल्या पण परत त्यांना दररोज जे करत होत्या ते करत राहिल्या. असेच एकदा काही लोकांनी त्यांची विचारपूस केली व त्यांना या वृध्दाश्रमात आणुन ठेवले.

आता या महिला वृध्दाश्रमात राहत आहेत. त्याची योग्य प्रकारे समुपदेशन करून त्या तिथे राहत आहेत. त्या असे सांगत होत्या की मला येथे आल्यापासून मला हक्काचे घर मिळाल्यासारखे वाटले. कारण त्यांना सर्व काही नविन वाटत होते. त्या कोणाशी जास्त बोलत नव्हत्या. त्यांना वृध्दाश्रमात राहतांना समायोजनात येणाऱ्या अडचणी आल्या त्यामध्ये

१) सर्वात प्रथम त्यांना तिथे करमेनासे झाले.

२) अस्वस्थ वाटत होते, त्यांना असे वाटत होते की आपले गावच बरे, आपण मागुन खात होते तेच बरे.

३) कोणाचीही ओळख नसल्यामुळे बोलावेसे वाटत नव्हते.

पण कालांतराने वृध्दाश्रमात त्यांच्या ओळखी होत गेल्या. वृध्दाश्रमात भजन, गाणे, गप्पा गोष्टी अशा सर्व गोष्टी होत असल्यामुळे मला इथे माझे घरच वाटते असे त्या सांगत होत्या.

वृध्द म्हणल्यास आरोग्याच्या समस्या तर येणारच असे त्या सांगत होत्या. म्हातारपणात काळजी घ्यावी असे त्या सांगत होत्या. पण या आपलेसे वाटणाऱ्या घरामध्ये म्हणजेच वृध्दाश्रमात आरोग्याच्या समस्येबाबत विचारपुस करतात किंवा जर काही दुःख असेल तर ते दवाखान्यात घेवून जातात असे त्या सांगत होत्या.

वृध्दाश्रम हेच आमचे घर आहे. इथेच मिळाली भाकरी इथेच मिळेल जीवनाला आधार. वृध्दाश्रम म्हणजे माझे घर मला वाटते. इथे मला भाकरी मिळते, सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहे.

खुप करमते. मनोरंजनासाठी भजन होते, गाणे, पुस्तके वाचायला ग्रंथालय आहे. त्यामुळे मला इथे मी मेले तरी माझी माती इथेच करा असे त्या सांगत होत्या.

**निष्कर्ष :**

1. व्यष्टी अध्ययनाच्या आधारे, सुमित्रा भिसे यांचे वृद्धाश्रमात राहणाऱ्या अनुभवांना देखीलत त्यांची जीवनशैली आणि आत्मवृत्ती सुधारित झाली आहेपुर्वीच्या स्थितीतील एक अध्ययनानुसार ., त्यांना कठीण कठोरतेने आलेली जीवनपरिस्थितींमुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्यांमुळे अधिकांश तकलीफ होतीपरंतु ., आता वृध्दाश्रमात राहणाऱ्या त्यांना समायोजन करण्यात अधिक मदत होती आहे.

पुर्वीच्या स्थितीमध्ये त्यांना सांघातिक परिस्थितींमुळे स्थायी ठरलेले घर, शेतीचे मुळे किंवा कोणत्याही आपत्तीत सहाय्य न करण्यामुळे कठिणाई आलीत्यांचे आपले आत्मविश्वास घटले ., परंतु कालांतराने वृध्दाश्रमात त्यांना सामाजिक, आरोग्यिक आणि मानसिक समर्थन मिळाला आहे.

वृद्धाश्रमात राहतांना समायोजनात येणाऱ्या अडचणींचा वर्णन करतांना, त्यांच्या आत्मवृत्तीमध्ये सुधारिती दिसतेअध्ययनानुसार ., वृद्धाश्रमात सर्वप्रथम त्यांना सामाजिक समावेश आणि आत्मनिर्भरता सुनिश्चित करण्यात मदत केली जातेवृद्धाश्रमात सहज उपलब्ध असलेली सोयी सुविधा . वापरून, त्यांना आत्मत्रुटी वाटते आणि सामाजिक सहवासातील सुखाची अनुभूती होते.

आता, वृध्दाश्रमात राहतांना आरोग्याच्या समस्यांची संजीवनी मिळाली आहेत्यांना आयुर्वेदिक . औषधोपचार, नियमित वैद्यकीय तपासणींची सुविधा मिळते, जी त्यांना स्वस्थ आणि चिरपरिणामी ठरवू शकतेवृद्धाश्रमात राहताना त्यांना सर्वच सांगत होते की त्यांनी आत्मतत्त्वाचा संशोधन केला . आहे, त्यांच्या आत्मवृत्तीमध्ये सुधारिती झाली आहे.

**शिफारशी :**

1. सुमित्रा भिसे यांच्या व्यष्टी अध्ययनावरून हे स्पष्ट होते की वृद्धाश्रमात राहणे त्यांच्या जीवनशैली आणि आत्मवृत्तीसाठी फायदेशीर ठरू शकते. या शिफारसी वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींसाठी अधिक चांगल्या जीवनशैली आणि आत्मवृत्तीचा पाया निर्माण करण्यास मदत करू शकतात.

**सामाजिक समावेश आणि आत्मनिर्भरता**

वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींना सामाजिक समावेश आणि आत्मनिर्भरता सुनिश्चित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी, वृद्धाश्रमांमध्ये खालील गोष्टींचा समावेश केला जाऊ शकतो:

- सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रम: वृद्धाश्रमांमध्ये नियमितपणे सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले पाहिजेत. या कार्यक्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींना एकत्र येण्याची आणि एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळते.
- आत्मनिर्भरता कौशल्ये शिकवणे: वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींना आत्मनिर्भरता कौशल्ये शिकवली पाहिजेत. या कौशल्यांमध्ये स्वयंपाक, धुणे, कपडे धुणे इत्यादींचा समावेश होतो. हे कौशल्ये वृद्ध व्यक्तींना स्वतःची काळजी घेण्यास आणि त्यांच्या जीवनात अधिक स्वायत्त होण्यास मदत करतात.

**आरोग्य सेवा:–**

वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींना चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. यासाठी, वृद्धाश्रमांमध्ये खालील गोष्टींचा समावेश केला जाऊ शकतो:

- **नियमित वैद्यकीय तपासणी**: वृद्ध व्यक्तींना नियमितपणे वैद्यकीय तपासणी केली पाहिजे. या तपासणींद्वारे त्यांच्या आरोग्य समस्यांचे निदान आणि उपचार करणे शक्य होते.
- **आयुर्वेदिक उपचार**: आयुर्वेदिक उपचार हे वृद्ध व्यक्तींसाठी एक प्रभावी उपचार पर्याय असू शकतो. वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींना आयुर्वेदिक उपचार उपलब्ध करून दिल्याने त्यांच्या आरोग्याची गुणवत्ता सुधारण्यास मदत होऊ शकते.

**मानसिक आरोग्य सेवा:-** वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे. यासाठी, वृद्धाश्रमांमध्ये खालील गोष्टींचा समावेश केला जाऊ शकतो:

- मानसिक आरोग्य तज्ञांचा सल्ला: वृद्ध व्यक्तींना मानसिक आरोग्य समस्या असल्यास त्यांना मानसिक आरोग्य तज्ञांचा सल्ला घेण्याची संधी दिली पाहिजे.
- मानसिक आरोग्य कार्यक्रम: वृद्धाश्रमांमध्ये मानसिक आरोग्य कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. या कार्यक्रमांद्वारे वृद्ध व्यक्तींना मानसिक आरोग्य समस्यांचे व्यवस्थापन करण्यास मदत होते.

या शिफारसी वृद्धाश्रमांमध्ये वृद्ध व्यक्तींसाठी अधिक चांगल्या जीवनशैली आणि आत्मवृत्तीचा पाया निर्माण करण्यात मदत करू शकतात.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1. **नागापूरकर वैजयंती**, 2003, **वृद्धत्वाची शान**, **मुंबई**, **इंडियन एज्युकेशन सोसायटी प्रकशन**

2. Sen, A., et al. (2019). Enhancing the Quality of Life for Elderly Residents in Senior Living Facilities: A Comprehensive Approach. Journal of Gerontology, 24(3), 123-137.

3. Sharma, R., & Patel, S. (2020). Health Challenges Faced by the Elderly in Senior Living Facilities: A Comprehensive Review. Journal of Aging and Health, 18(2), 45-62.

* * *

# वृध्दांचे कौटुंबिक सामाजिक समायोजन : एक प्रश्न

***प्रा. डॉ. अरुंधती पाटील***
मार्गदर्शक
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय
व संशोधन केन्द्र अंबाजोगाई

***पिराजी विठ्ठलराव कमळे***
संशोधक विद्यार्थी
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय
व संशोधन केन्द्र अंबाजोगाई

**सारांश :**

भारतीय परंपरेनुसार, कुटूंबातील वृध्द सदस्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी कुटुंबांचे वर्णन केले गेले आहे. आज बदलत्या कौटुंबिक रचनेमुळे वृध्दांच्या समस्या वाढल्या आहेत. अलिकडच्या वर्षात विभक्त कुटुंबांच्या उद्योन्मुख व्याप्तीमुळे, जुन्या श्रीमंत कुटुंबातील सदस्यांना मानसिक, शारीरिक आणि आर्थिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो. हा अभ्यास लेख शहरातील तसेच खेड्यातील सर्वात वृध्द लोकांच्या समस्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीबद्दल अंतदृष्टि प्रदान करते आणि वृध्द लोकांसाठी सामाजिक कार्यात हस्तक्षेप करण्यास मदत करते.

**मुल शब्द :**

वृध्द लोकसंख्या, आरोग्य परिमाण, जुनाट आजार, वृध्द व्यक्ती, सामाजिक, आर्थिक समस्या, राहण्याची व्यवस्था. वृध्द समस्या, कौटुंबिक व सामाजिक समयोजन.

**प्रास्तावना :**

मानव समाजाच्या उत्पत्तीपासून तर आजपर्यंतचा समाजाचा कोणताही कालखंड घेतला तर असा कोणताच कालखंड नाही की ज्यात सामाजिक समस्या नव्हत्या. प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत, आदीम समाजापासून तर २१ व्या शतकातल्या प्रगत समाजापर्यंत सामाजिक समस्या नेहमीच आढळून येतात.

ज्या प्रमाणे समाजाचे जगणे वागणे इत्यादीत बदल होत आला त्या प्रमाणे सामाजिक समस्या सार्वत्रिक व सर्वकालीन असल्या तरी स्थळ व काळानुसार त्याचे स्वरुप बदलत गेले. आदिवासी समस्या प्रगत समाजाच्या समस्यापेक्षा वेगळ्या असतात. ग्रीमीण समाजाच्या समस्या नागरी समाजाच्या समस्येपेक्षा भिन्न असतात. भारतातील लोकसंख्येची समस्या, ग्रामीण भारतातील समस्या, मद्यपानाच्या समस्या, भ्रष्टाचार, दहशतवादाची समस्या, भारतातील दुर्बल घटकांच्या समस्या, नागरीकरणाशी संबधित समस्या, असहिष्णुता दंगली आणि गुन्हे ई समस्या आपणास पहावयास मिळतात. त्यापैकीच एक म्हणजे वृध्दांच्या समस्या होय. सामाजिकदृष्ट्या ही समस्या एक भीषण रुप धारण केलेली आपणास पहावयास मिळते. या समस्येचे हे उग्र रुप समाजाच्या दृष्टीक्षेपात यावे तसेच या घटकांची समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून ओळख व्हावी या दृष्टीने महत्वपूर्ण माहितीसाठीच्या अनुसरु विषय मांडावयाचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कुटुंब संस्थेच्या विघटनातून वृध्दत्वाची समस्या निर्माण झाली संयुक्त कुटुब आणि विभक्त कुटुब हे सदस्य संख्या वर आधारित कुटुबाचे प्रकार आहेत. संयुक्त कुटुंबात एकाहुन अधिक प्रमाणात सदस्य एकत्र राहत असतात सामायिक निवासस्थान, एकत्रित भोजन, देव आदि कार्यक्रम, संपत्ती, पूजा विधी या बाबी संयुक्त कुटुंबात महत्त्वाचे असतात. प्राचीन समाज व्यवस्था ही बलुतेदारीवर अवलंबून होती तर अर्थव्यवस्थाही शेतीवर अवलंबुन होती. कुटुंबात वृध्द व्यक्तीला मानाचे स्थान होते त्याच्या विचाराला घरात किंमत होती, वृध्द व्यक्तीला कुटुंबात सांभाळले जात होते जोपर्यंत त्याचे हात—पाय चालत होते तोपर्यंत त्या व्यक्तीचाच कुटुंबात सल्ला घेत असत परंतु आज विसाव्या शतकात औद्योगीकरण, शहरीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे संयुक्त कुटुंबामध्ये संरक्षणात्मक आणि कार्यात्मक बदल झाले त्यानंतर वृध्दत्वाची समस्या निर्माण झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

बऱ्याच वेळी पुढारलेल्या पाश्चात्य देशांत ज्या विषयांची चर्चा चालत असते त्याच विषयांची चर्चा साहजिकच भारतातही चालते. भारतासारख्या गरीब देशाशी तुलना करता ह्या संपन्न देशात आर्थिक प्रश्न वेगळे किंवा जवळजवळ सुटलेले आहेत. त्यांच्याकडे कुटुंबसंस्था, स्त्रियांच्या घराबाहेर जाऊन केलेल्या नोकऱ्या, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिमत्त्वाचा विकास व त्यामुळे असणारी किंवा वाढणारी स्वयं—केंद्रितता हे प्रश्न जास्त प्रकर्षाने जाणवतात. त्यातच वृध्द होरपळत असले तर त्यांच्या समस्या चर्चेला येतात. वृध्द म्हणजे सामान्यपणे साठ वर्षे वयावरील लोक असे गृहित धरले जाते. संपन्न देशांत आज सरासरी आयुर्मान ७८ वर्षांपर्यंत गेलेले आहे.

भारतात २०११ च्या लोकसंख्येनुसार आठ टक्के लोक हे वयाच्या ६० वर्षे व त्यापेक्षा जास्त वयोगटातील आहेत. महाराष्ट्रात ही लोकसंख्येच्या तुलनेत ९.३ टक्के आहे. वृध्दावस्थेत प्रत्येक व्यक्तीत मानसिक व शारीरिक बदल मोठ्या प्रमाणावर घडून येतात. त्याकडे लक्ष न दिल्यास त्याचे रुपांतर नैराश्यामध्ये होण्याची दाट शक्यता असते. नैराश्य वाढल्यामुळे देशात वृध्दांच्या आत्महत्याही मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. हा प्रकार थांबवण्याकरिता वृध्दांची प्रत्येक व्यक्तीने काळजी घेत त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

वृध्दपणा म्हणजे परिपक्वता, विचारांची जीवनविषयक अनुभवांची केवढी तरी शिदोरी वृध्दांजवळ असते, पण ती पेलणारी शरीरयंत्रणा मात्र थकत चाललेली असते. वाढत्या वयामुळे शरीराला येणारी ही थकावट माणसाला अस्वस्थ करते, सुखाला ओहोटी लावते. वार्धक्य ही मानवी जीवनातील एक अटळ अशी व्यवस्था आहे. प्रत्येक व्यक्तीस आयुष्याच्या उत्तरार्धात वार्धक्य हे येतच असते, परंतु हे वार्धक्य मानवी जीवनात असंख्य प्रश्न घेऊन येत असते.

एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये लहान मुले आणि घरातील वृध्द यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सहजपणेच होत असे. किंबहुना लहान मुलांसाठी वृध्दांची गरज असे, परंतु बदलत्या काळाबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. वाढते शहरीकरण,

औद्योगिकीकरण यामुळे आर्थिक ताणतणाव मुख्यतः निर्माण होत आहेत. शिवाय ग्रामीण पालक आणि शिकलेली पुढची पिढी यातही तणाव निर्माण होत आहेत. असे असंख्य ताणतणाव वृध्दांच्या जीवनात निर्माण झालेले आहेत. परंतु मुख्य प्रश्न मानसिकच असतो. निवृत्त झाल्यामुळे काय करावे ते कळत नाही, जीवनात एक पोकळी निर्माण होते. हे सारे शहरी वृध्दांबद्दल ग्रामीण वृध्दांच्या जीवनात आर्थिक समस्या अधिक तीव्र असतात. शरीर थकलेले असते अशा अवस्थेत आपण दुर्लक्षित आहोत, नकोसे झाले आहोत असा भाव निर्माण होऊन मानसिक विकलता आलेली असते. एकंदरीत काय की, वृध्दांच्या जीवनात असंख्य समस्या निर्माण झालेल्या असतात. अशा समस्यांवर गंभीरपणे चर्चा होणे आवश्यक ठरते. वृध्दाबाबतीत होणारा दुर्व्यवहार, आत्याचार, छळ याविषयी आत्मचिंतन व्हावे. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सामाजिक चेतना जागृती करता यावी, वृध्दांना सन्मानाने आरोग्यसंपन्न जीवन जगता यावे, त्यांना सामाजिक, कौटुंबिक सुरक्षा प्राप्त व्हावी यासाठी धोरण आखून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे तसेच हा या लेखामधून जनजागृती करणे मुख्य हेतू आहे.

**अभ्यासाचे महत्त्व :**

जुन्या श्रीमंत लोकांच्या काळजीशी संबंधित समस्या किंवा आजकाल धोरण चर्चेच्या प्रकाशात आहेत, जेव्हा आपल्या भारतात आणि जगभरात वेगाने सामाजिक आणि आणि आर्थिक बदल होत आहेत, तेव्हा आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे वृध्दावस्थेतील लोकांना भेडसावणाऱ्या विविध प्रमुख सामाजिक आणि आर्थिक समस्यांवर आणि कौटुंबिक काळजी आणि आधार यासारख्या घटकांवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. समस्यांच्या प्रमुख कारणांबद्दल आणि त्यांच्या जीवनाबद्दलच्या नकारात्मक वृत्तींबद्दल सर्वात वृध्द लोकांच्या धारणा जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे, जेणेकरुन वैद्यकीय/आरोग्य सेवा, भावनिक आधार, समुपदेशन इत्यादी बाबतीत सामाजिक कार्याच्या हस्तक्षेपाच्या व्याप्तीचे मूल्यांकन करण्यात मदत होईल.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१. वृध्दांचे कौटुंबिक व सामाजिक समायोजन यांचा अभ्यास करणे.
२. वृध्द लोकांमध्ये अस्तित्वात असलेल्या जुनाट आजारांबद्दल समजून घेणे.
३. ज्या क्षेत्रात सामाजिक कार्यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे ते ओळखणे.
४. वृध्दाच्या समस्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. वृध्दांचा कुटुंबातील दर्जा कमी झालेला आहे.
२. वृध्दाना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.
३. बदलत्या परिस्थितीशी वृध्दांना समायोजन साधता न आल्याने वृध्दत्वाचा प्रश्न गंभीर बनला आहे.
४. अपवादात्मक वर्तमान परिस्थितीत वृध्दाश्रम ही आधार अवस्था आवश्यक आहे.

**संशोधनाची नवीनता :**

संशोधकांच्या मते वृध्दापकाळातील बऱ्याच समस्या ह्या अनुकूलन प्रक्रियेतुन सोडविले जाऊ शकतात. अभ्यास केलेल्या विषयांवर आधारित लिहिताना अस जाणवते की वृध्दत्वाशी निगडीत समस्या अनेक वर्षे त्याच समस्या होत्या, आहेत मात्र या समस्यांच समायोजन केलं जात होतं मात्र तसं होताना दिसत नाही आणि त्या समस्या डोके वर काढत असल्याचे आपल्या लक्षात येते. संशोधनाची पध्दत विशिष्ट वैशिष्ट्यांवर आधारित असून अभ्यासाची सामग्री आणि परिणाम सेवा हे सर्वज्ञात आहेत.

एक समाज म्हणून आपण सुधारित राहणीमान आणि आरोग्य सेवेमुळे बरेच दिवस जगत आहोत. वृध्दापकाळापर्यंत पोहोचणे हे आभ्भार मानण्यासारखे असले तरी, अनेक मार्गांनी, वृध्दांसमोर अनेक आव्हाने आहेत, ज्याकडे आपण सर्वांनी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. अनेकदा आपण स्वत:चे वय वाढू लागेपर्यंत किंवा एखाद्या प्रिय व्यक्तीला आपण उठून बसतो आणि लक्षात घेतो अशा समस्येशी झुंजताना पाहत नाही, परंतु एक समाज म्हणुन आपल्या वृध्द लोकांचे जीवन सोपे करण्यासाठी आपण बरेच काही करु शकतो. हा लेख आज वृध्द लोकांसमोर येणाऱ्या सर्वात मोठ्या आव्हानांची रुपरेषा देतो आणि आम्ही त्यांना कसे समर्थन देऊ शकतो आणि त्यांना सन्मानाने वयात येण्यास सक्षम कसे करु शकतो हा विचार करणे महत्त्वाचे आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात गुणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला असून माहितीचा स्त्रोत म्हणून दुय्यम (द्वितीय) साधनसामुग्रीचा उपयोग केला आहे, यात विषयाला अनुसरून वेगवेगळे पुस्तके, ग्रंथ, ग्रंथालयातील मासिके, वृत्तपत्रे, वेबसाईड, विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थांचे अहवाल, संशोधनपर लेख आणि अप्रकाशित संशोधन साहित्य इत्यादी चा उपयोग केला आहे.

**वृध्द व्यक्तीच्या मुख्य समस्या :**

सामाजिक व आर्थिक बदलत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागल्याने वृध्दांपुढे अनेक प्रकारच्या समस्या उभ्या राहतात, विशेषत: आर्थिक दृष्ट्या दुर्बल व परावलंबी असलेल्या वृध्दांचे पालनपोषण, उदरनिर्वाह, वैद्यकीय उपचारार्थ करावा लागणारा खर्च इ. आर्थिक बाबी त्या व्यक्तीपुढे व समाजापुढे गंभीर प्रश्न उभे करतात.

**कौटुंबिक समस्या :**

भारतात औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या वाढीमुळे संयुक्त जागी विभक्त कुटूंबांची संख्या वाढू लागल्याने कुटूंबातील तरुण सदस्यांना लग्नानंतर आई—वडिलांसोबत राहायचे नाही. परिणामी, ज्या वयात एखाद्या व्यक्तीला त्याच्या मुलांकडून सर्वात जास्त मदतीची आणि संरक्षणाची गरज असते, त्या वयात त्यांना एकटेपणा आणि निराधार वाटू लागतो. वृध्द पती—पत्नीपैकी एकाचा मृत्यू झाला, तर त्या व्यक्तीचे दु:ख वेदना इतर कोणाशीही शेअर करण्याची स्थिती उरली नाही. ही एकटेपणाची भावना वृध्दापकाळातील मानसिक तणावाचे एक प्रमुख कारण आहे. वृध्दांच्या कौटुंबिक शोषणाचा अंदाज आपल्या पालकांना परदेशात घेऊन जाणाऱ्या

तरुणांच्या संख्येवरुनच लावता येतो आणि त्यांना घरातील नोकरांपेक्षा वाईट जीवन जगण्यास भाग पाडते.

अनेक तरुण जे आपल्या पालकांना परदेशात घेऊन जातात आणि त्यांना घरातील नोकरांपेक्षा वाईट जीवन जगण्यास भाग पाडतात, ते स्वत: वृध्दांच्या कौटुंबिक अत्याचाराला बळी पडले आहेत. जेष्ठ्यांचा कुटुंबात होणारा छळ जाणता—अजाणता होत असतो. त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करणे, पदोपदी अपमानित करणे, त्यांच्या क्षमतेची कुचेष्टा करणे, आर्थिक शोषण आणि फसवणूक करुन वृध्दांना छळले जाते. त्यांचे कुटुंबातले अस्तित्वच नाकारले जाते. त्यामुळे कौटुंबिक समस्येयला सामोरे जावे लागते.

**सामाजिक समस्या :**

सुरुवातीला हे ओळखणे महत्वाचे आहे की जेष्ठाचं सामाजिकदृष्ट्या महत्व आणि यांच्यातील आरोग्य विषयक हालचाली कशा आहेत यावरुन त्यांच्या जीवनातील समस्या आपोआप आपल्या दृष्टीक्षेपात येतील. तरुण व वयोवृध्द यांच्यातील संबंध अधिक सलोख्याचे संबंध कुठेही पाहायला मिळत नाही. आपले स्वतंत्र जीवन जगण्यासाठी वृध्दांना काहींची गरज असते दैनंदिन जीवन जगण्यासाठी मुलभूत आवश्यकता आणि कौशल्ये सामाजिक उपक्रम हाती घेण्याची क्षमता समाविष्ट आहे, आणि वैयक्तिक आणि घरगुती कामे करावी लागतात एकंदरित वृध्दांचे दैनंदिन क्रियाकलाप जिवंत या तीन पैलूंना संबोधित जे एकमेकांशी जोडलेले आहे असे म्हणावे लागेल. त्यासाठी वयोवृध्द लोकांचे सामाजिक सलोख्याचे संबंध असणे फारच महत्त्वाचे आहे. मुळात तेच पहायला मिळत नाही.

वृध्दावस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शरीराजील अनेक अवयव कमजोर झालेले असतात, त्याचबरोबर कुटुंबातील अनेक व्यक्तींची बोलणी खावी लागतात. अंधत्व, दात पडणे, एकू कमी येने, व्यक्ती ओळखता न येणे अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या संपूर्ण कारणांमुळे त्यांना सामाजिक समस्या उदभवत असतात.

भारतीय समाजात रुढ असलेल्या जातीप्रथा संयुक्त कुटुंब, बलुतेदारी प्रथा गृह उद्योग शेतीवर आधारलेली अर्थव्यवस्था यामुळे समाजातील वृध्दाचे स्थान भुमिका वैशिष्ट्यपूर्ण होती अर्थव्यवस्थेतील श्रमविभाजन साधे वय व लिंगावर आधारलेले होते. व्यवसायातील तंत्र व यंत्र साधे व अप्रगत होते. समाजात वृध्दांच्या अनुभवाला आणि म्हणुन वयाला मान होता तो आता मिळेनासे झाला आणि म्हणुन या समस्या दिसून येतात.

वृध्दांना आपल्या बदललेल्या जीवनशैलीबद्दलचे असमाधान जास्त तीव्रतेने जाणवते. सर्वसाधारणपणे वृध्द व्यक्तीचे समाजातील स्थान हे उत्पादकतेतील त्याच्या क्रियाशील सहभागावर व उपयोगितेवर बहुतांशी अवलंबुन असते. पारंपारिक कृषीप्रधान समाजात वृध्द पिढीला आदराचे व मानाचे स्थान असल्याचे सामान्यत: दिसून येते, कारण वृध्द व्यक्तीचे शेतीकामातील अनुभवजन्य ज्ञान हे शेतकऱ्यांच्या तरुण पिढीला

उपयुक्त ठरते. शिवाय जमिनीची मालकी ही बऱ्याचदा वृध्दाकडे असल्याने कुटुंबप्रमुख म्हणून कुटुंबातले त्याचे स्थान अबाधित राहते. ज्ञानाची मौखिक परंपरा जेथे चालत आली आहे, अशा प्राक्साक्षर समाजातही वृध्द पिढीच्या अनुभवाधिष्ठित ज्ञानाला मौलिकता प्राप्त होते.

वृध्दापकाळातील सामान्य स्थितींमध्ये श्रवणशक्ती कमी होणे, मोतीबिंदू आणि अपवर्तक त्रुटी, पाठ आणि मान दुखणे आणि ऑस्टियोआर्थरायटिस, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज, मधुमेह, नैराश्य आणि स्मृतिभ्रंश यांचा समावेश होतो. लोक वयानुसार, त्यांना एकाच वेळी अनेक परिस्थिती अनुभवण्याची शक्यता असते असे असले तरी त्या व्यायामाच्या साथीने सोडविता ही येते त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे व्यायाम करणे, तुमचा मेंदू सक्रिय ठेवणे आणि सर्जनशीलता राखणे खरोखरच संज्ञानात्मक घट आणि स्मरणशक्तीच्या समस्या टाळण्यास मदत करु शकते. तुम्ही जितके अधिक सक्रिय आणि सामाजिक असाल आणि तुमचा मेंदू जितका अधिक वापराल आणि तीक्ष्ण कराल तितके अधिक फायदे तुम्हाला मिळतील. परंतु तसे होताना दिसत नाही म्हणून समस्या जाणवत असतात.

**वृध्दांच्या समस्या निर्मितीची कारणे :**

वृध्दत्व ही नैसर्गिक घटना आहे जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते त्याच बरोबर औद्योगीकरण भारतीय जीवन मुल्यावर पाचवे त्याच प्रभाव चंगळवाद समिश्र समाज पध्दती यात वृध्दाला दुर्लक्षित केले. यातूनच वर्षांच्या समस्या निर्माण झाल्या आणि सध्याच्या समाज व्यवस्थेच्या बदल्यात परिस्थितीनुसार वृध्दांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे भारतात एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ ७५ टक्के लोक वृध्द आहेत. वृध्दांच्या समस्या मागील पुढील कारणे पाहता येतील.

पारंपारिक भारतीय समाजात अमृता पध्दती असल्यामुळे व्यवसायिक शिक्षण कुटुबातच मिळत असे यामुळे वृध्दाच्या अनुभवाचा व्यावसायिक कसबाचा लाभ पुढील पिढीला होत असे. शेती, उद्योग याबाबतीत वृध्दाकडून सल्ला घेतला जाईल पण आज आधुनिकीकरण, औद्योगिकरणामुळे नवीन तंत्रज्ञान आले त्यातुन उत्पादन वाढले त्यामुळे वृध्दाच्या सल्ल्याला, ज्ञानाला नवीन पुढे दुय्यम मानू लागली यातूनच पिढ्यामध्ये रा निर्माण होऊन वृध्दांचे प्रश्न निर्माण होऊ लागले.

पूर्वीचे एकत्र कुटूंब जाऊन आईवडील व लहान मुले एकत्र राहत असलेले एककेंद्री वा एकेरी कुटुंब अस्तित्वात आले. वृध्द माणसे अशा कुटुंबात तरुण नातलगांपासून व एकमेकांपासून तुटत व अलग पडत गेल्याचे दिसून येते. कौटुंबिक नातेसंबंधातील अशा बदलांचे दुष्परिणाम वृध्दांना भोगावे लागतात. पूर्वीच्या एकत्रित कुटुंबात वृध्दांना लाभणारा आदर व अधिकार कौटुंबिक विघटनामुळे व एककेंद्रि कुटुंबपध्दतीमुळे लोप पावत गेला, तसेच कुटुंबप्रमुख म्हणून असलेले वृध्दांचे स्थानही ढळत गेले. कुटुंबातील तरुण व वृध्द पिढ्यांमध्ये मानसिक दुरावा व विसंवाद यांची खोल दरी निर्माण होत गेल्याने वृध्दांना कित्येकदा गंभीर भावनिक ताणतणावांना तोंड द्यावे लागते. आधुनिक समाजात झपाट्याने होत असलेले नागरीकरण, व्यवसायप्रधान जीवनपध्दती व त्यांतुन

उद्‌भवलेली गतिशिलता, तरुण पिढीची व्यवसायाभिमुखता व आधुनिक अर्थव्यवस्थेत त्यांना प्राप्त झालेले महत्त्वपूर्ण स्थान इ. घटकांमुळे आधुनिक उद्योगप्रधान समाजजीवनात वृध्द पिढीला गौण व दुय्यम स्थान पत्कारावे लागते. वाढत्या वयाबरोबर उद्भवणाऱ्या वृध्दांच्या शारीरिक—मानसिक व्याधी व तदनुषंगिक समस्यास यांत लक्षणीय वाढ झाली असून, त्यांची उग्रता व गांभीर्य भेडसावणारे आहे. तसेच वृध्दांच्या लोकसंख्येतील वाढीचा विपरीत परिणाम एकूण अर्थव्यवस्थेवर होण्याचीही शक्यता असते. तसेच कौटुंबिक आधार गमावलेल्या वृध्दांच्या निवाऱ्याचा प्रश्न बिकट झाला आहे.

**कौटुंबिक व सामाजिक समायोजन :**

समायोजन एक निरंतर प्रक्रिया म्हणून देखील परिभाषित केले जाऊ शकते ज्यामध्ये एखादी व्यक्ती स्वतः आणि त्याच्या वातावरणामध्ये अधिक सुसंवादी संबंध निर्माण करण्यासाठी त्याचे वर्तन बदलते. वैकल्पिकरित्या, व्यक्ती आणि त्याचे वातावरण यांच्यातील समतोल स्थिती म्हणून त्याची संकल्पना केली जाऊ शकते.

समायोजन ही व्यक्तीची ती स्थिती आहे जी त्यांच्या शारीरिक, व्यावसायिक आणि सामाजिक वातावरणातील बदलांशी जुळवून घेण्यास सक्षम आहे. दुसऱ्या शब्दात समायोजन विरोधाभासी गरजा किंवा वातावरणातील अडथळ्यांद्वारे आव्हान असलेल्या गरजा संतुलित करण्याच्या वर्तन प्रक्रियेचा संदर्भ देते. जेव्हा ते त्यांच्या शारीरिक स्थितीमुळे अन्न शोधण्यासाठी उत्तेजीत होतात, तेव्हा ते त्यांची भूक कमी करण्यासाठी (शक्य असल्यास) खातात आणि अशा प्रकारे भूक उत्तेजनाशी जुळवून घेतात. जेव्हा वातावरणातील काही गरज किंवा ताणतणावात सामान्य समायोजन करण्यास असमर्थता असते.

उच्च दर्जाचे जीवन जगण्यासाठी यशस्वी समायोजन महत्त्वाचे आहे. ज्यांना व्यवस्थित जुळवून घेता येत नाही त्यांना क्लिनिकल चिंता किंवा नैराश्य तसेच हताशपणा, एनहेडोनिया, लक्ष केंद्रित करण्यात अडचण, झोपेची समस्या आणि बेपर्वा वर्तन अनुभवण्याची शक्यता असते.

समायोजनाचे मूल्यमापन करताना त्याचा दोन प्रकारे विचार केला जाऊ शकतो. एक उपलब्धि म्हणून समायोजन आणि प्रक्रिया म्हणून समायोजन.

आज भौतिक सुखाच्या कल्पनांच्या विस्तार झाल्यामुळे व्यक्तिवादी विचारांची जोपासना समाजात मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे आणि यादी उत्पन्न उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करण्याची अभिलाषा हिताला प्राधान्य यातून माता—पित्यांना शारीरिक, कौटुंबिक, मानसिक धक्का बसतो एकाच घरात वेगळी चूल, वेगळा स्वयंपाक, वेगळी खोली जे काही संपूर्ण आयुष्यभर जगलो नाही असे जीवन जगण्याची वेळ आल्यामुळे मानसिक खच्चीकरण होत आहे हद्दित आपण काळाच्या बरोबर राहू शकत नाही, याची जाणीव त्याला स्वतःला डाचत असते, स्वतःला वृध्द समजण्याचे तो टाळतो, वृध्दत्वाचा द्वेष करतो, हीच एक महत्त्वाची समस्या वृध्दपणाच्या प्रथम सोडविता आली पाहिजे.

वाढत्या वयामुळे शरीराला येणारी थकावट माणसाला अस्वस्थ करते, सुखाला ओहोटी लावते. 'सुखी म्हातारपण म्हणजे गुलबकावलीचे फूल' असे 'नटसम्राट' मधील

बेलवलकर म्हणतात. गुलबकावलीचे फूल जसे नेहमीच दुर्मिळ असते, तीच गोष्ट सुखी म्हातारपणाबद्दलही खरी असते. सुख हे मानण्यावर आहे.

पुढच्या पिढीला हे अनुभवाचे धन आपण देऊ शकतो, ते त्यांना त्यांच्या कलाकलाने शिकविणे, त्यांच्याशी मोठेपणाने पण मैत्रीचे संबंध जोडणे, त्यांच्या मनात आपल्याबद्द विश्वासाचे व आपुलकीचे वडीलधारे नाते निर्माण करणे हे वृध्दांना जमले पाहिजे.

कधी कधी आपण आपण केलेल्या चुका तरुण पिढी करताना दिसल्यावर त्यांना त्यामधले धोके सांगावेसे वाटतात. परंतु तरुण पिढीला या 'वृध्दांचे अनुभवांचे बोल' रूजण्याइतके पक्केपण आलेले नसते, त्यामुळे ते त्यांच्या वाटेने, स्वतंत्रपणे वागताना पाहून वृध्दांना आपले घरातले व तरुण पिढीच्या मनातले स्थान ढळल्याचे दु:ख होत असते. अशा वेळी 'दुसऱ्यांच्या चुकांनी माणसे सुधारत नसतात. असे समजुन त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. 'आपण त्यांच्यापेक्षा मोठे आहोत' हे समजून वागायला शिकणे वृध्दपणाचे धोके टाळण्यासाठी आवश्यक असते.

एकाकीपण टाळण्यासाठी पेलेल अशा उद्योगात किंवा छंदामध्ये स्वत:ला गुंतवून घ्यावे. ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनांमधून होणाऱ्या सामाजिक कार्यात सहभाग घ्यावा. आहार—विहारात नियमितता ठेवून प्रकृतीची काळजी स्वत:चे दिवसाचे वेळापत्रक स्वत: ठरवून जगण्याची सवय लावावी.

वृध्दपणा ही समस्या आहे की, स्वत:कडे, स्वत:च्या छंदाकडे लक्ष देत आनंद घेण्याचा काळ आहे, हे ज्याचे त्यानेच ठरवायचे असते. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे! चित्ती असू द्यावे समाधान'!! ळी वृत्ती वृध्दपणाला सगळ्यात जास्त लागू पडणारी आहे.

वृध्दपणाचा विचार जेवढा मध्यमवर्गीयांमध्ये केला जातो तेवढा त्यांच्यापेक्षा आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेल्या समाजाला करता येत नाही. त्यापैकी ज्यांना वृध्दाश्रमाची वाट चालावी लागते त्यांना तिथेही अन्न, वस्त्र,निवारा पुरेसा मिळत नसतो, त्यामुळे त्यांना घरच्या मुलामाणसांत राहायला जाण्याची इच्छा व्हावी, हे पुष्कळसे स्वाभाविक आहे. पण मध्यमवर्गीयांना परवडणारे वृध्दाश्रम त्यांच्या आर्थिक ताकदीनुसार बऱ्यापैकी सोयीसुविधा देऊ शकतात. अशा वृध्दाश्रमातील माणसांशी संपर्क ठेवण्याचा, त्यांचे मनोरंजन करण्याचा उद्योग काही सामाजिक संस्था करीत असतात. एक आक्टोंबर जगभर 'वृध्ददिन' साजरा होतो, त्यामुळे वृध्दांबद्दलची सहानुभूतीची जाणीव समाजमनामध्ये जागी ठेवली जाते. वृध्द मंडळींनी स्वत: एकत्र येऊनही व्यसनमुक्ती, संस्कारशिक्षण, अपंगांना मदत असे काही सामाजिक कार्य सुरु केले तर त्यांचा वेळ चांगल्या प्रकारे जाईल व त्यांचे एकाकीपण दुर होऊ शकेल.

पुढच्या पिढीच्या मैत्रीचे व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करण्याने हे परावलंबित्व व एकटेपण सुसह्य होऊ शकते. पुढच्या पिढीला उपदेश करू नये, त्यांच्या गरजा व समस्या समजून घ्याव्यात, घराचे अधिकारपद त्यांना आपण देत नसतो, तर ते त्यांना निसर्गक्रमाने मिळत असते हे भान ठेवावे. घरात असूनही घरातल्या गोष्टींत गरजेपुरतेच लक्ष देणे हे वृध्दांना जमले पाहिजे. तरूण व मुले आपल्याशी जिव्हाळ्याने व आदराने

वागावीत असे वाटत असेल तर त्यांच्यापुढेही आज जे डोंगराएवढे प्रश्न आहेत, ते समजून घ्यावेत. शक्यतोवर आपली आर्थिक जबाबदारी आपण दुसऱ्यांवर सोपवू नये. एकाकीपण टाळण्यासाठी पेलेल अशा उद्योगात किंवा छंदामध्ये स्वत:ला गुंतवून घ्यावे. जेष्ठ नागरिकांच्या संघटनांमधून होणाऱ्या सामाजिक कार्यात सहभाग घ्यावा. आहार—विहारात नियमितता ठेवून प्रकृतीची काळजी स्वत:च घ्यायला शिकावे. स्वत:चे दिवसाचे वेळापत्रक स्वत: ठरवून जगण्याची सवय लावावी.

**समारोप :**

वार्धक्यवेतन ही आजची गरज आहे. त्याचा परिणाम तरूण व वृध्द दोघांवरही होईल. तरूणांना आपली म्हातारपणाची सोय होऊ शकते आहे असा विश्वास निर्माण होईल. वृध्दांनाही आपण आपल्या पायावर उभे आहोत असे वाटेल. ह्या गोष्टींचा परिणाम समाजाच्या विचारसरणीवर झाल्याशिवाय राहणार नाही. त्यात मुलांकडे पाहण्याी दृष्टीही बदलेल, आणि तेच आपल्याला हवे आहे.

शरीराला येणारा हा वृध्दपणा मनाने स्वीकारायला शिकले पाहिजे. आपल्याला आलेल्या म्हाताराणाने आपल्या शारीरिक शक्ती पूर्वीइतक्या जोमदार राहणार नाहीत, ही जाणीव ठेवून वागणे हे त्याला जमले पाहिजे. तसेच आपल्या जीवनभराच्या आयुष्याने आपल्यास जे अनुभवांचे संचित दिलेले आहे, त्याचा शांतपणे विचार करण्याची सवय त्याने लावून घ्यायला पाहिजे.

वाढत्या प्रौढ वयातून जेव्हा व्यक्ती वृध्दपणाकडे झुकू लागते तेव्हा तिला हा वृध्दपणा नको असतो. लोकांनी आपल्याला 'म्हातारा' म्हणू नये, याची ती काळजी घेऊ लागते. ''शरीर थकले तरी आपण मनाने तरूण आहोत, तरूणांच्या बरोबरीने काम करू शकतो, तरूणांना लाजवील असा उत्साह आपल्याजवळ आहे.'' हे सिध्द करण्याचा ती अट्टहास करीत असते तसे करणे वृध्दांनी टाळले पाहिजे.

एकीकडे माणसाला खूप जगावे असे वाटत असते, पण नवल म्हणजे म्हातारपणाचा मात्र तिटकारा असतो. याचे कारण उघड आहे. वृध्दपणामुळे देहातील काम करण्याी शक्ती व उमेद कमी कमी होत जाते. आणि वृध्द व्यक्ती निराश होत असतो.

तरूण व मुले आपल्याशी जिव्हाळ्याशी जिव्हाळ्याने व आदराने वागावीत असे वाटत असेल तर त्यांच्यापुढेही आज जे डोंगराएवढे प्रश्न आहेत, ते समजून घ्यावेत. शक्यतोवर आपली आर्थिक जबाबदारी आपण दुसऱ्यांवर सोपवू नयेत. असे जर केले नाही तर त्यांचे जीवन सुखी होऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. लोकसत्ता ठीम, (१४ एप्रील २०१६), लोकसत्ता मराठी इ पेपर प्रकाशन मुंबई

२. खैरनार दिलीप (२०१६), वृध्दांच्या समस्या : चिंता चिंतन, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद पृष्ट क्रमांक १२९ ते १३२.

३. दांडेकर कुमुदिनी (मे, २०००), वृध्दांच्या समस्या सुधाकर मराठी इ वृत्तपत्र पुणे.

४. पेढोले ज्ञानोबा विठ्ठलराव (२०२१), वृध्दांच्या कुटुंब विषयक समस्या—एक समाजशास्त्रीय अध्ययन January 2021 Vol.10 No.1
५. मंगल, एस के. (२००२), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र २ री आवृत्ती नवी दिल्ली, प्रेंटिस—हॉल ऑफ इंडिया. पृष्ठ क्र. १४३
६. https://en.wikipedia.org/wiki/Adjustment_(psychology)
७. https://www.drishtiias.com/hindi/blog/status-proble ms-and-solutions-of-elderly-in-india
८. https://www.csirs.org.in/uploads/paper_pdf/bharat-mein-vridh-ki-samajik-samasyan.pdf
९. https://www.allresearchjournal.com/archives/2020/vol6issue10/PartM/6-10-316-428.pdf
१०. गुप्ता, एल एम. शर्मा, डी डी. (१९८०), समकालीन भारत में सामाजिक समस्यायें द्वितीय आवृत्ती, आगरा साहित्य भवन पब्लीकेशन : पृष्ठ क्र. १०९.
११. किरदार बि एच. पांडे दया. खडके सुध्दा. (२०२०), भारतीय सामाजिक समस्या, प्रथम आवृत्ती, पुणे : प्रशांत पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ०९.
१२. पोतदार, शंकरराव, (१९९७), वृध्दत्व : समस्या आणि उपाय, पृथमावृत्ती, मुंबई : अनुपमा पब्लिकेशन. पृष्ठ क्र २४.

* * *

# उपजीविका आणि आर्थिक समावेशन ; राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची महिलांच्या आर्थिक सहभाग व स्वावलंबनाच्या योगदानाचा अभ्यास) संदर्भ लातूर तालुका

*डॉ. हनुमंत साळुंके*
मार्गदर्शक
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय
व संशोधन केन्द्र, *अंबाजोगाई जि. बीड*

***प्रकाश सुभाषराव राठोड***
संशोधक,
संशोधन केंद्र, मानवलोक समाजकार्य
महाविद्यालय, अंबाजोगाई

**प्रस्तावना –:**

लिंग आधारित समाज रचनेमुळे ,महिला सामाजिक आणि आर्थिक बाबतीत दुर्लक्षित राहिल्यात .महिलांत आर्थिक स्वावलंबन निर्माण करून त्यांचा सहभाग वाढविणे व सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) हे आशेचे किरण म्हणून उदयास आले आहे, ज्याचा उद्देश ग्रामीण महिलांना शाश्वत उपजीविका आणि आर्थिक समावेशाद्वारे सक्षम करणे होय. NRLM सहभागामुळे महिलांच्या उत्पन्नात झालेली मूर्त वाढ आणि त्यांच्या कुटुंबातील आर्थिक योगदान या बाबत प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून आढावा घेण्यात येणार आहे .तसेच उत्पन्नाच्या पलीकडे ,NRLM द्वारे सुविधा असलेल्या महिला आणि स्वयं-सहायता गट (SHGs) द्वारे औपचारिक वित्तीय सेवांमध्ये प्रवेश आणि आर्थिक सुरक्षिततेच्या क्षेत्राचत झालेली प्रगती या संशोधना साठी महत्वाची ठरते .

महिलांची असलेली बचत खाते , त्यांना मिळालेल्या कर्जाचा वापर आणि मिळालेली आर्थिक सुरक्षितता हे महिलांच्या वाढत्या सहभाग व मालकीचे प्रमाण दर्शविते .आर्थिक साक्षरता च्या माध्यामतून महिलांना फक्त आर्थिक बाबी विषयीच ज्ञान देऊन चालणार नाही तर त्यांना संसाधानाचे प्रभावी व्यवस्थापन आणि आर्थिक सुरक्षितता व हमी या बाबी सुनिश्चित करण्यासाठी ज्ञान व कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे .

अनेक अभ्यासांनी महिलांच्या आर्थिक सहभागावर NRLM चा सकारात्मक प्रभाव नोंदवला आहे .

**जागतिक बँक, –(2019)** राजस्थानमधील जागतिक बँकेच्या अभ्यासात असे आढळून आले की NRLM हस्तक्षेप असलेल्या गावांमध्ये स्वयंरोजगार उपजीविकेच्या क्रियाकलापांमध्ये %20.4 वाढ आणि महिलांच्या श्रमशक्तीच्या सहभागामध्ये %13.6 वाढ झाली आहे) जागतिक बँक, .(2019

**दासगुप्ता आणि इतर., – (2017)** यांनी ओडिशात केलेल्या एका अभ्यासात असे निष्कर्ष काढला की, NRLM च्या माध्यमातून सुरु केलेल्या बचत गटामुळे महिला सदस्यांच्या उत्पन्न वाढ झाली आणि आर्थिक बाबीवर महिलांचे योगदान असल्यामुळे त्यांना आर्थिक व्यवहार करण्यास स्वातंत्र्य मिळाले व त्या पूर्वीच्या तुलनेत अधिक आर्थिक दृष्ट्या सक्षम वा स्वावलंबी झालेल्या आढळून आल्यात .

**अग्रवाल, –(2015)** ग्रामीण महिलांमध्ये आत्मनिर्भरता वाढवण्याचे श्रेय NRLM ला दिले जाते . NRLM अंतर्गत स्वयं-मदत गट) SHGs) ची निर्मिती सामूहिक कृती, आर्थिक साक्षरता आणि

निर्णय घेण्याची कौशल्ये वाढवते, ज्यामुळे महिलांमध्ये अधिक आत्मविश्वास आणि आत्मविश्वास वाढतो) सिंग एट अल., .(2018अभ्यासातून असे दिसून आले आहे की SHG सहभागामुळे आर्थिक धक्क्यांचा सामना करण्याची आणि स्वतंत्र आर्थिक निर्णय घेण्याची महिलांची क्षमता वाढते.

**जहांगीर, )2017) –**यांनी nrlm समोरील आव्हाने आणि मर्यादा या बाबत केलेल्या संशोधनात असे दिसून आले की, निश्चितच nrlm चे सकारात्मक परिणाम दिसून येतातयामुळे महिला सक्षमीकरणास . .मदत झाली व याची परिणीती आर्थिक व सामाजिक सक्षमीकरनात दिसून आली

**बेरा एट अल., )2018 ,( कुमार, )2019) यांनी nrlm च्या** सकारात्मक परिणाम सोबतच काही NRLM ची आव्हाने आणि मर्यादा अधोरेखांकित केल्या आहेत .यामध्ये अपुरे कौशल्य प्रशिक्षण, बाजारपेठेपर्यंत मर्यादित प्रवेश आणि महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला सतत अडथळे आणणारे सामाजिक अडथळे यासारख्या समस्यांचा समावेश आहे.

**कुमार, )2019).** यांनी एनआरएलएमच्या प्रभावाच्या टिकाऊपणाबद्दल चिंता व्यक्त केली. सुरुवातीच्या काळात उत्साह असतो परंतु कालांतराने या बाबीवर परिणाम होऊन हे अभियान काही शकतात या प्रमाणात किंवा या अभियानाचा कालावधी संपल्यानंतर कितपत सुरु केलेले व्यवसाय सुरु राहू कोणतेही मार्गदर्शन व पर्यवेक्षण नसल्यामुळ .बाबत चिंता व्यक्त केलीे सुरु केलेले व्यवसाय किंवा महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया बाधित होऊ शकते असी भीती व्यक्त केली .

प्रस्तुत संशोधनात nrlm च्या माध्यमातून महिला खरेच सक्षम झाल्यात का? त्यांना देण्यात येणारे कौशल्य प्रशिक्षण व आर्थिक आणि सामाजिक सहभागा बाबत केलेले प्रयत्न यशस्वी होतात का या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी व nrlm च्या उद्देशास अधिक बळकट करण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे का या बाबींचा आढावा घेण्यासाठी प्रतुत संशोधन करण्यात आले आहे .Nrlm चे यश आणि आव्हानांचे बारकाईने विश्लेषण करून, या अभ्यासातून NRLM अधिक बळकट करण्यासाठी आणि ग्रामीण स्त्रिया आर्थिक समृद्धी आणि सामाजिक बदलाचे सशक्त साधन म्हणून उदयास येऊ शकतात का ?या सारख्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले गेले आहे .

**उद्दिष्टे : –**

- ग्रामीण महिलांसाठी उपजीविकेच्या संधींच्या निर्मितीवर आणि शाश्वततेवर NRLM च्या हस्तक्षेपाच्या (मायक्रोफायनान्स, कौशल्य विकास, मार्केट लिंकेज) च्या प्रभावाचे मूल्यांकन मुल्यांकन करणे.
- Nrlm मध्ये सहभागामुळे महिलांचे उत्पन्न आणि त्यांच्या कुटुंबातील आर्थिक योगदानाचा अभ्यास करणे
- NRLM उपक्रमांद्वारे महिलांच्या औपचारिक वित्तीय सेवा (बचत खाती, कर्ज, विमा) मधील प्रवेश आणि वापर यांचा आढावा घेणे.
- NRLM च्या आर्थिक साक्षरता कार्यक्रमांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे.

**संशोधन पद्धती :–** प्रस्तुत संशोधनाकरिता लातूर तालुक्यातील पाच गावांची निवड सहेतुक पद्धतीने करून या पाच गावातील बचत गटांची यादी करून प्रत्येक गावातील नमुना संख्या २० निर्धारित करून प्रत्येक बचत गटातील सदस्यांना प्रस्तुत संशोधनात समाविष्ट केले. निवडलेल्या बचत गटातील सदस्या सोबत गट चर्चा करून मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली. पाच गावातील एकूण 100 एककाची निवड नमून म्हणून करण्यात आली व मुलाखत–अनुसुचीच्या माध्यमातून तथ्य संकलित केले गेले.

**उपजीविका आणि उत्पन्न:**

**सारणी क्र. 01 NRLM मध्ये सामील होण्यापूर्वी उत्पन्नाच्या स्त्रोताची स्थिती**

| अनु. क्र | विशेष | नाही |
|---|---|---|
| **01** | होय | 29% |
| **02** | नाही | 71% |
| **एकूण** | | 100% |

वरील सारणी वरून असे दिसून येते की, येणाऱ्यांमध्ये सामील होण्यापूर्वी महिलांच्या उत्पन्नाची स्त्रोत अतिशय मर्यादित होते. 29 टक्के महिलांच्या मतानुसार त्यांच्याकडे पूर्वीपासूनच उत्पन्नाचे मर्यादित स्त्रोत होते, तर 71% महिलांच्या मतानुसार यांना आर एल एम मध्ये सामील होण्यापूर्वी त्यांच्याकडे निश्चित असे उत्पन्नाचे कोणतेही स्त्रोत नव्हते. वरील सारणी वरून दिसून येते की बहुतेक महिलांकडे येणाऱ्या मध्ये सामील होण्यापूर्वी निश्चित असे उत्पन्नाचे स्त्रोत नव्हते

**आलेख क्र. 01 NRLM मध्ये सामील होण्यापूर्वी उत्पन्नाच्या स्त्रोताची स्थिती**




NRLM मध्ये सामील होण्यापूर्वी 71 % प्रतिसादकर्त्यांकडे उत्पन्नाचा कोणताही स्रोत नव्हता, जे आर्थिक अडचणींशी झगडत असलेली मोठी लोकसंख्या हायलाइट करते. म्हणजेच बहुसंख्य प्रतीसादकाकडे लक्षणीय आर्थिक असुरक्षितता होती.

मर्यादित उत्पन्नाच्या संधी: तर उत्पन्न असलेल्यांमध्ये, शेतीचे प्राबल्य 20% आहे, त्यानंतर छोटे व्यवसाय (1%) आणि शेत मजुरी कामगार (20 %). होते वरील तथ्य असे दर्शिविते की, प्रतीसादाकाकडे मर्यादित वैविध्य आणि संभाव्यतः कमी उत्पन्न पातळी प्रतीसादाकाकडे उपलब्ध होती.

**आलेख क्र. 02 NRLM मध्ये सामील झाल्यानंतरची स्थिती**




कौशल्य विकासाचा उच्च वापर: 85% सहभागींनी कौशल्य विकास प्रशिक्षण प्राप्त केले, जे लोकांना उपजीविका निर्मितीसाठी नवीन कौशल्यांसह सुसज्ज करण्यावर लक्ष केंद्रित करते. मायक्रोफायनान्स आणि मार्केट लिंकेजचा मध्यम वापर: मायक्रोफायनान्स आणि मार्केट लिंकेजचा अनुक्रमे 35% आणि 60% वापर करतांना प्रतिसादक दिसून येतात तर, कौशल्य विकासाच्या तुलनेत त्यांचे महत्त्व परंतु शक्यतो कमी व्यापक प्रवेश सूचित करतात.

**आलेख क्र. 03** NRLM मध्ये सामील झाल्यानंतरची उत्पन्न स्थिती




**बहुसंख्य प्रतीसादाकाच्या उत्पन्नावर सकारात्मक परिणाम**: लक्षणीय 70% प्रतिसादकर्त्यांनी NRLM मध्ये सामील झाल्यापासून त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे नोंदवले. हे सहभागींच्या मोठ्या भागासाठी आर्थिक कल्याण सुधारण्याच्या कार्यक्रमाच्या संभाव्यतेवर प्रकाश टाकते.

**किमान उत्पन्नात घट**: केवळ 5% लोकांनी उत्पन्नात घट नोंदवली, जे सुचवते की NRLM हस्तक्षेपांचा सहसा सहभागींच्या आर्थिक परिस्थितीवर नकारात्मक परिणाम होत नाही.

**काहींसाठी स्थिर उत्पन्न**: 25% लोकांना उत्पन्नात कोणताही बदल झालेला नाही. यामागील कारणे समजून घेण्यासाठी पुढील तपासाची आवश्यकता असू शकते, जसे की आधीपासून अस्तित्वात असलेले स्थिर उत्पन्न स्रोत किंवा NRLM हस्तक्षेप वापरण्यात येणारी विशिष्ट आव्हाने.

**सारणी क्र. 02 आर्थिक समावेशन दर्शविणारी सारणी**

| अनु. क्र. | विशेष | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | NRLM मध्ये सामील होण्यापूर्वी बचत खाते? | 81% | 19% | 100 |
| 2 | आता बचत खाते आहे का? | 100% | 00 | 100 |
| 3 | NRLM मध्ये सामील होण्यापूर्वी कर्ज घेतले | 35% | 65% | 100 |
| 4 | कधीही NRLM किंवा SHG द्वारे कर्ज घेतले आहे | 76 % | 24% | 100 |
| 5 | कोणताही विमा (जीवन, आरोग्य, पिके) | 90 % | 10% | 100 |

**बचत खात्याच्या प्रवेशामध्ये लक्षणीय वाढ**: NRLM मध्ये सामील होण्यापूर्वी, फक्त 19% सहभागींकडे बचत खाते होते. सामील झाल्यानंतर ही संख्या 100% वर पोहोचली, जे औपचारिक वित्तीय सेवांमध्ये प्रवेशामध्ये मोठी सुधारणा दर्शवते.

**वर्धित कर्ज सुलभता**: NRLM पूर्वी 35% लोकांकडे कर्जाचा प्रवेश होता, तर 76% ने सामील झाल्यानंतर NRLM किंवा SHGs मार्फत कर्ज मिळवण्याचा अहवाल दिला. हे कर्ज घेणे सुलभ करण्यात, सहभागींसाठी आर्थिक संधींचा संभाव्य विस्तार करण्यात कार्यक्रमाच्या यशावर प्रकाश टाकते.

**व्यापक विमा संरक्षण**: प्रभावी 90% सहभागींनी NRLM मध्ये सामील झाल्यानंतर विमा (जीवन, आरोग्य किंवा पीक) असल्याची नोंद केली. हे जोखीम व्यवस्थापन आणि आर्थिक धक्क्यांपासून

आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी NRLM च्या भूमिकेचे सकारात्मक चित्र दिसत आहे. सहभागींनी बचत खाती, कर्जे आणि विम्यामध्ये अधिक प्रगती केली, ज्यामुळे त्यांची वित्त व्यवस्थापित करण्याची, मालमत्ता तयार करण्याची आणि आर्थिक जोखमींचा सामना करण्याची क्षमता वाढली.

**सारणी क्र. 03 NRLM आर्थिक साक्षरतेच्या प्रशिक्षणात सहभाग बाबत**

| अनु. क्र | विशेष | टक्केवारी मध्ये वारंवारता |
|---|---|---|
| 01 | होय | 85 % |
| 02 | नाही | 15 % |
| 03 | एकूण | 100 % |

आर्थिक साक्षरते करिता एन आर एल एम किंवा बचत गटाच्या माध्यमातून विविध प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत असते. या प्रशिक्षणात सर्वाधिक म्हणजे 85 टक्के प्रतिसादकांनी सहभाग नोंदविला असे दिसून येते. तर 15% प्रतिसादक हे प्रशिक्षणा बाबत जागरूकता नसणे, दुर्लक्ष किंवा इतर अडचणी मुळे प्रतिसादक या प्रकारच्या प्रशिक्षणास

सहभागी झालेले दिसून येत नाही. वरील सारणी वरून असे दिसून येते की, प्रतिसादखे आर्थिक साक्षरता प्रशिक्षणात लक्षणीय सहभागी झालेले होते. या प्रशिक्षणात प्रभावीपणे वित्त व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्य यावर भर देण्यात येत असतो, याचा उपयोग प्रतिसादकांना आर्थिक बाबीचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी होतो.

**सारणी क्र. 04 NRLM आर्थिक साक्षरता प्रशिक्षणामध्ये समाविष्ट विषय**

| अनु. क्र | प्रशिक्षणातील विषय | होय | नाही |
|---|---|---|---|
| 01 | बचत | 85 % | 15 % |
| 02 | कर्ज | 71 % | 29 % |
| 03 | बजेटिंग | 69 % | 31 % |
| | विमा | 91 % | 9 % |

या प्रशिक्षणात मुख्यतः आर्थिक संकल्पनांवर भर देण्यात आलेला दिसून येतो यात पुढील प्रमुख क्षेत्रांना प्राधान्य दिलेले दिसून येते, जसे बचत (85%), विमा (91%), आणि कर्ज (71%). या प्रशिक्षणामुळे मूलभूत आर्थिक व्यवस्थापन कौशल्य विकसित होतात व याचा उपयोग सहभागींना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास आणि जबाबदार आर्थिक वर्तनासाठी होतो. प्रस्तुत प्रशिक्षणात बजेट करिता कमी महत्व दिलेले दिसून येते, एकूण प्रतीसादाकांच्या पैकी 69 % प्रतीसादाकांच्या मते बजेट वर कमी महत्व देण्यात आले किंवा इतर विषयाच्या तुलनेत कमी महत्व दिल्या गेले.

वरील सारणी वरून असे दिसून येते की, प्रशिक्षणात आर्थिक साक्षरतेच्या विविध पैलुना संबोधित करण्यासाठी सर्व समावेशक असे प्रशिक्षण प्रतीसादाकांना देण्यात आले.

**आलेख क्र. 04 NRLM च्या प्रशिक्षणामुळे आर्थिक व्यवस्थापन अधिक आत्मविश्वासात वाढ**




उल्लेखनीय 90% सहभागींनी प्रशिक्षणाला उपस्थित राहिल्यानंतर त्यांच्या आर्थिक व्यवस्थापनात अधिक आत्मविश्वास व आत्मविश्वासात लक्षणीय वाढ असल्याचे नोंदवले. प्रशिक्षणातील सहभाग हे प्रतीसादाकांच्या आर्थिक स्वयं-कार्यक्षमतेवर सक्षम सकारात्मक प्रभाव दर्शविते, तर केवळ 10% लोकांमध्ये अजूनही आत्मविश्वासाची कमतरता आहे, किंवा त्यांना या प्रशिक्षणाचा लाभ झालेला दिसून येत नाही.

**चर्चा आणि निष्कर्ष –:**

एकूणच, ग्रामीण महिलांचे आर्थिक कल्याण आणि आर्थिक समावेशन सुधारण्यावर NRLM हस्तक्षेपांचा सकारात्मक परिणाम दिसून येतो . उद्दिष्टेगट चर्चा व संकलित तथ्यांचे विश्लेषण केले असता खालील प्रमाणे निष्कर्ष काढण्यात आली .

**उपजीविका निर्मिती आणि निरंतरता** : या अभियानात सहभागामुळे प्रतीसादाकात उत्पन्न स्त्रोता बाबत लक्षणीय सुधारणा दिसून आली . बहुसंख्य सहभागीताकडे या अभियानात सहभागी होण्यापूर्वी उत्पन्नाचे स्रोत नव्हते (71%) त्यांनी NRLM मध्ये सामील झाल्यानंतर त्यांच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण झालेले दिसून येतात जे यशस्वी उपजीविका निर्मिती दर्शवते. शेती प्रबळ असताना, कौशल्य विकास आणि बाजारपेठेतील जोडण्यांसारख्या NRLM हस्तक्षेपांमुळे लहान व्यवसाय आणि मजुरी यासारख्या इतर उत्पन्न देणाऱ्या क्रियाकलापांमध्ये प्रवेश सुलभ झाला व उत्पन्नाचे विविध स्त्रोतांची निर्मिती झालेली दिसून येते .

**उत्पन्न वाढ**: या अभियानात सहभागाचा सकारात्मक प्रभाव दिसून येतो . NRLM मध्ये सामील झाल्यानंतर 70% सहभागींनी वाढीव उत्पन्नाची नोंद केली, तसेच आर्थिक कल्याण सुधारण्यासाठी त्याची प्रभावीता रेखांकित केली.

या अभियानात सहभागी झालेल्या प्रतीसादाकात किमान नकारात्मक प्रभाव दिसून येतो, केवळ 5% प्रतीसादाकांनी त्यांचे उत्पन्न घटले असा अनुभव सांगितला .उत्पन्न घट करिता इतर हि परिणाम करणारे घटक असू शकतात, NRLM हस्तक्षेप सहसा सहभागींच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम करत नाहीत. 25% प्रतीसादाकांच्या उत्पन्नात कोणताही बदल का झाला नाही हे समजून घेण्यासाठी पुढील तपास करणे आवश्यक आहे .संभाव्यत: आधीच अस्तित्वात असलेल्या स्थिर उत्पन्नाच्या स्रोतांमुळे किंवा NRLM हस्तक्षेपांसह विशिष्ट आव्हानांमुळे कदाचित उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत नाही.

प्रस्तुत संशोधनात असे दिसून येते की, nrlm मध्ये सहभागी प्रतीसादाकांचे आर्थिक समावेशन झालेले आहे .औपचारिक वित्तीय सेवांमध्ये सुधारित प्रवेश झालेला दिसून येतो . बचत खात्यात लक्षणीय वाढ (19% ते 100%) आणि NRLM किंवा SHGs द्वारे कर्जाचा लाभ / उपलब्धता (35% ते 76%) आर्थिक समावेशनाला चालना देण्यात यश दर्शविते.

- 2.Shaikh S, Mburu G, Arumugam V, et al.: Empowering communities and strengthening systems to improve transgender health: Outcomes from the Pehchan Programme in India. **J Int AIDS Soc** 2016; 19:20809 Crossref, Google Scholar
- 3.Wylie K, Knudson G, Khan SI, et al.: Serving transgender people: Clinical care considerations and service delivery models in transgender health. **Lancet** 2016; 388:401–411 Crossref, Google Scholar
- 4.Shivakumar ST, Yadiyurshetty MM: Markers of well-being among the hijras: the male to female transsexuals, in **Psychology Serving Humanity: Proceedings of the 30th International Congress of Psychology**, vol 1. Edited by Cooper S,Ratele K. New York, Psychology Press, 2014, pp 218–232 Google Scholar
- 5.Kalra G: Hijras: The unique transgender culture of India. **Int J Cult Ment Health** 2012; 5:121–126 Crossref, Google Scholar
- 6.Agoramoorthy G, Hsu MJ: Living on the societal edge: India's transgender realities. **J Religion Health** 2015; 54:1451–1459 Crossref, Google Scholar
- 7.Sharma DC: Changing landscape for sexual minorities in India. **Lancet** 2014; 383:2199–2200 Crossref, Google Scholar
- 8.Reddy G: **With respect to sex**. Chicago, University of Chicago Press, 2005 Crossref, Google Scholar
- 9.Kalra G, Shah N: The cultural, psychiatric, and sexuality aspects of hijras in India. **Int J Transgenderism** 2013; 14:171–181 Crossref, Google Scholar

- **10.**Meyer I: Prejudice, social stress, and mental health in lesbian, gay, and bisexual populations: conceptual issues and research evidence. **Psychol Bull** 2003; 129:674–697 Crossref, Google Scholar
- **11.**Russell S, Fish J: Mental health in lesbian, gay, bisexual, and transgender (LGBT) youth. **Ann Rev Clin Psychol** 2016; 12:465–487 Crossref, Google Scholar
- **12.**Semlyen J, King M, Varney J, et al.: Sexual orientation and symptoms of common mental disorder or low wellbeing: combined meta-analysis of 12 UK population health surveys. **BMC Psychiatry** 2016; 16:1–9 Crossref, Google Scholar


* * *

# समृद्ध महाराष्ट्राच्या वाढत्या पाणी संकटातून उद्भवणाऱ्या दुष्काळाची मीमांसा

***प्रा. डॉ. अरुंधती पाटील***
*मार्गदर्शक*
संशोधन केंद्र, मानवलोक समाजकार्य
महाविद्यालय,अंबाजोगाई, जिबीड.

***राहुल महादेव गिरी***
संशोधक,
संशोधन केंद्र, मानवलोक समाजकार्य
महाविद्यालय, अंबाजोगाई

**गोषवारा(Abstract) :**
स्वातंत्र्योत्तर काळात जलसंचयनाच्या दृष्टीने महाराष्ट्रात अत्यंत भरीव अशा स्वरूपाची काम स्व.यशवंतराव चव्हाण व स्व.शंकरराव चव्हाण यांच्या नेतृत्वात झाली. भारतातील एकूण धरणांपैकी जवळपास अर्धी धरण एकट्या महाराष्ट्रात निर्माण झाली. तसा महाराष्ट्र हा जलसंस्कृतीचा अत्यंत भव्य वारसा लाभलेला प्रांत. याचा प्रत्यय आपणास महाराष्ट्रात जागोजागी आढळून येण्या-या जलव्यवस्थापनाच्या प्राचीन व मध्ययुगीन नमून्यांद्वारे येऊ शकतो. तत्कालीन काळात महाराष्ट्राला सिंचनाच्या दृष्टीने परिपूर्ण करण्याचा प्रयत्न होत असताना हाच महाराष्ट्र पेयजलासाठी संघर्ष करेल अशी पुसटशीही शंका निर्माण होण्याला कुठेही वाव नव्हता. एवढ्या मोठ्या प्रमाणात धरणांची निर्मिती होऊन देखील धरण उशाल मात्र कोरड घशाला हे चित्र सर्रासपणे धरणांच्या पायथ्याला दिसून येत आहे. महाराष्ट्रात आठमाही पाणी की बारमाही पाणी अशा स्वरूपाचे वाद गाजलेले आपण अनुभवले आहेत, मात्र त्याच महाराष्ट्रात इतक्या लवकर पाणी संकटातून उद्भवणाऱ्या दुष्काळाची कारणमीमांसा करावी लागते आहे यापेक्षा भीषण ते अजून काय असू शकतं? समृद्ध महाराष्ट्राला पाणी संकटातून उद्भवणाऱ्या दुष्काळातून बाहेर काढण्यासाठी प्रत्येकाच्या सकारात्मक कृतीप्रवण विचारांची नितांत आवश्यकता आहे.

**की-वड्र्स (Key-Words) :** समृद्ध महाराष्ट्र , पाणी संकट, दुष्काळ , भूजल

**प्रस्तावना )Introduction) :**
महाराष्ट्रातले पाणी संकट समजून घेत असताना एक बाब लक्षात घ्यावी लागेल की ते केवळ पाण्याच्या उपलब्धतेचे संकट नसून पाण्याच्या गुणवत्तेचे व पाण्याच्या वितरणाचे देखील आहे आणि महाराष्ट्राचे हेच अनेक तोंडी पाणी संकट आर्थिक, सामाजिक व राजकीय वातावरण तापवताना आढळून येते आहे. सिंचनासाठी एवढी सगळी धरण बांधली गेली तरीही अनेक

योजनांची अपूर्णता आणि पर्यावरणाचा बदलता कल यामुळे महाराष्ट्राच्या पाणी आणि शेतीचं अतोनात नुकसान झालं. पुढे भारतभर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं जे लोण पसरलं त्याची सुरुवात महाराष्ट्रातच झाली. भलेही आज मोठ्या प्रमाणात पाऊस आमच्या अंगाखांद्यावरून निथळत असल्याने या पाणी संकटाची तीव्रता आम्हाला जाणवत नसली तरीही या दशकात दंडकारण्याची वाळवंटीकरणाच्या दिशेने झालेली वाटचाल आम्हाला नजरेआड करता येणार नाही. हा पावसाळा सरला की महाराष्ट्रात मोठ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडणाऱ्या भागापासून ते अत्यंत अल्प पाऊस पडलेल्या भागांपर्यंत सकाळी उठल्याबरोबर पाण्यासाठी मैलोंची पायपीट करणाऱ्या महिलांच्या रांगा अनेक वाहिन्या आणि वृत्तपत्रांतून आपण दररोज पाहतो. ही बाब महाराष्ट्रात इतकी नित्याची झाली आहे की याप्रती आपल्या संवेदनाही आता बोथट झाल्या आहेत.

जागतिक पातळीवर प्रती वर्षी युद्ध किंवा दहशतवादी हल्ल्यांत मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा अनेक पटीने अधिक लोक दूषित पाणी व पाणी संकटामुळे मृत्यू पावतात. पाणी संकट हे युद्ध किंवा दहशतवादी हल्ल्यांप्रमाणेच क्रूरता धारण करू पाहत असताना देखील युद्ध किंवा दहशतवादी हल्ल्यांविरोधात आपल्या मनात जशी संघटित होण्याची भावना निर्माण होते तशी ती पाणी संकटाच्या दहशतीला हाताळण्यासाठी निर्माण होताना कदापिही आढळत नाही. याउलट महाराष्ट्राच्या मराठवाडा, विदर्भ आणि इतर काही प्रांतातून लोकांच घर-दार त्यागून स्थलांतर करण्याचं प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढलय. पुणे, पिंपरी चिंचवड आणि मुंबई शहराभोवती आढळणा-या अनेक वस्त्या किवा झोपडपट्टया या याच स्थलांतरित लोकांनी भरल्याच्या दिसतात. युद्धजन्य परिस्थितीमुळे सिरियातून होणारे स्थलांतर आपल्याला आंतरराष्ट्रीयदृष्ट्या फार महत्वपूर्ण वाटत आले आहे. मात्र पाणी संकटामुळे महाराष्ट्रात घडून येणारे हे स्थलांतर आपल्या दृष्टीने अत्यंत गौण आहे ही बाब गंभीर नाही का ? समृद्ध महाराष्ट्राच्या वाढत्या पाणी संकटातून उद्भवत चाललेला दुष्काळ अनाहूतपणे फोफावत जाऊन त्याची भीषणता वेळीच ओळखून राजकीय, सामाजिक व इतर अनेक पातळ्यांवर कृतीप्रवण होणे आवश्यक आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा )Review of Literature):**

- महाराष्ट्र कृषिवर्धिनी ओक्टोंबर) ते डिसेंबर २०१८):-द्दुष्काळाचे आव्हान व उपाययोजना- डॉव्यंकट मायंदे .
- दुष्काळाची राजकीय अर्थव्यवस्था आणि उच्चाटनाची उपाययोजनादत्ता – देसाई
- जलसंकट अस्मानी नव्हे; सुलतानी - प्रावनराई) देसरडा.एम.एच.,डिसेंबर २०१

**(संशोधन पद्धती) Research Methodology) :**

महाराष्ट्राची सर्वांगीण समृध्द परंपरा पाहता वर्तमानात सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या पाण्याच्या विविधांगी संकटातून एकेकाळी समृद्ध असणारा महाराष्ट्र दुष्काळाच्या भीषणतेत कसा लोटला जातो आहे व त्याचे गांभीर्य काय या संशोधन प्रश्नांना समोर ठेऊन प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली असून प्रामुख्याने सन २०१० ते सन २०२० या दहा वर्षातील कालखंड मर्यादेचा विचार करून हा अभ्यास केला गेला आहे. यासाठी ऐच्छिक नमूना निवड पद्धतीचा अवलंब केला असून वर्णनात्मक संशोधन आराखडा पद्धत अंगिकारली आहे. वाढते पाणी संकट हे या काळात दुष्काळी परिस्थिती निर्मितीत अधिक कारणीभूत ठरते हे गृहीत मानून वाढत्या पाणी संकटातून उद्भवणाऱ्या दुष्काळाची सखोल मीमांसा करणे हा या संशोधना मागील उद्देश आहे.

**विश्लेषण (Analysis) :**

सन २०१० ते २०२० या दशकात महाराष्ट्रात पाणी टंचाई निर्माण होण्याच्या सरासरी वार्षिक वेगाचा आलेख हा चढा होता. या पाणी टंचाईला अनूसरून शासन निवारणार्थ उपाययोजना आखताना आणि त्या दाखवताना देखील दिसून आलं. मात्र निवारणापेक्षा निर्मूलनार्थ काय प्रयत्न झाले हे अधिक महत्वाचं आहे. आणि त्याहीपेक्षा समाजाने यासाठी काय पुढाकार घेतला किंवा संघटितपणा दाखवला हे जास्त महत्वाचं आहे. मात्र शासनाच्या अशा निवारण उपाययोजनांत लोकसहभागाचा मागमूसही आढळत नाही. जोपर्यंत समाज स्वयंसेवी वृत्तीने पुढाकार घेऊन या प्रश्नाला हाताळण्यासाठी स्वावलंबी होत नाही तोपर्यंत हा प्रश्न जटिलच म्हणावा लागेल. आजमितीला महाराष्ट्रात भुजलाचं प्रचंड शोषण आणि उपलब्ध पाण्याचं प्रदूषण होताना दिसून येतं आहे. बहुतांश पाणलोट क्षेत्रांत गाळ भरल्याचा दिसून येतो आहे. अनेक पारंपारिक जलस्त्रोतांवर अतिक्रमणे होताना आढळत आहेत यात गाव तसेच शहरांची भूशास्त्रीय तसेच भुपृष्ठिय जलसंरचना बदलून जेमतेम पावसातही नद्यांना पूर येणे तसेच भूजल खोलावण्याचे प्रमाण वाढले आहे. बीड शहराला लागून असलेली खजाना विहीर तिच्या भोवतीच्या शेकडो एकर जमिनीला विना वीज व विना पंप आपोआप पाणी पुरवत असे. यामागे त्या विहीरीची हजारो मीटर पर्यंत पोहचलेली भूसंरचना होती मात्र बीड शहराचा विस्तार आणि मोठमोठ्या इमारतींच्या उभारणीसाठी केलेलं खोदकाम यात या ऐतिहासिक विहीरीची संरचना पुर्णपणे लोप पावण्याच्या मार्गावर आहे. अशा स्वरूपाचे अनेक दाखले आपणास देता येतील. शहरीकरणापायी अशा अनेक पारंपारिक जलस्त्रोतांवर आपण घाव घालत आहोत. अशा स्वरूपाची वाटचाल आपण किती दिवस करणार आहोत आणि हीच वाटचाल आपण जर सुरू ठेवणार असू तर स्वतःला आपण किती दिवस वाचवू शकू? या प्रश्नाचा विचार व्हायला हवा.

पाण्याच्या मुबलकतेतून आम्ही प्रचंड संपत्ती कमावली आणि पैशाने सर्व समस्यांवर मात करता येते हा आमचा गैरसमज अधिकच दृढ होत गेला. याउलट अधिक पैसा आल्यानंतर काही कामं होण्याऐवजी बिघडतात सुद्धा याचा आदर्श वस्तूपाठ जलशोषणाच्या या संदर्भाने महाराष्ट्राने घालून दिला असं म्हणावं लागेल. पाण्यातून आलेला हाच पैसा पाण्याचाच अधिकाधिक उपसा करण्यासाठी वापरात आणला गेला आणि मग जमिनीच्या पोटातले पाण्याचे झरे नष्ट झाले, या बेफाम उपश्याने जमिनीच्या पोटातल पाणी पूर्णतः आटायला लागलं. अनेक मीटरपर्यंत भूगर्भात जाऊन किंवा अनेक किलोमीटरपर्यंत पाईपलाईन करून पाणी आणण्याची क्षमता एकाएकी नष्ट झाली. त्यातून पाण्यातून आलेली संपत्ती आणि याच संपत्तीचा वापर करून पाणी उपश्याची कमावलेली हावभरी ताकद संपल्यासारख झाल आहे. महाराष्ट्रातल्या लाखो बागा वाळून कोळ झाल्यात तर काहींचे अवशेष माणसांच्या अतिरिक्त अपेक्षांच फलित दाखवत उभे आहेत. पाण्यासाठी खोलवर जाण्याची स्पर्धा किती महागात पडली आहे नव्हे नव्हे ती आता जीवघेणी ठरली आहे! म्हणून आपण लक्षात घेतलं पाहिजे की केवळ पैसे खर्च करूनच समस्या सुटणार  नाहीत किंवा त्यावर कायमस्वरूपी मार्ग ही निघणार नाही त्यासाठी आपले मन आणि मेंदू सुद्धा वापरावा लागेल. आपली विकासाची संकल्पना शाश्वततेच्या मूल्यात जोखावी लागेल. आपला माणसांचं आणि हरित क्षेत्राच विस्थापन करू पाहणारा स्वार्थी विकास थांबवावा लागेल. पाण्याची उपलब्धता व गुणवत्ता श्वाश्वत करण्यासाठी झटावं लागेल. त्यासाठी पाणी नळातून नव्हे तर स्त्रोतातून येत हा समज शहरांतून दृढ करावा लागेल.

वरवर हे संकट जरी नैसर्गिक स्वरूपाचे वाटत असले तरी त्याच्या मुळाशी आपणच आहोत हे विसरायला नको. कारण सर्रासपणे पाऊसच पडत नसेल तर पाणी कुठून येईल अशा स्वरूपाची मानसिकता शासन-प्रशासन व सामान्य स्तरावरही पाहायला मिळते. मात्र पाऊस पडण्यासाठी आवश्यक असणारी हिरवी व निळी उष्णता पावसाला दूर पळवणाऱ्या लाल उष्णतेत परावर्तीत करायला देखील आपणच कारणीभूत आहोत. मुख्यतः पाऊस पडण्याच्या प्रक्रियेत समुद्राच्या किंवा इतर पाण्याचे बाष्पीभवन होऊन त्याचे ढगांमध्ये रूपांतर होईपर्यंत निळी उष्णता कार्यरत असते मात्र ते ढग बरसण्यासाठी किंवा त्यांचं पावसात रूपांतर होण्यासाठी हरित आच्छादनातून निर्माण झालेली हिरवी उष्णता कार्यरत असते. महाराष्ट्राच्या पाणी संकटामागे मुख्यतः या हरित उष्णतेचा अभाव आढळून येतो. ज्या प्रांतात जमीन विनाआच्छादित म्हणजे रिकामी किंवा मोठ्या प्रमाणात भागावर सिमेंट कोंक्रीटच्या इमारती, काचाचे भाग किंवा प्लास्टीक असेल तर त्यांवर पडणाऱ्या सूर्यकिरणातून निर्माण होणारी लाल उष्णता उलट परावर्तीत होऊन हरित उष्णतेऐवजी ती कार्यरत झाल्याने ढग बरसण्या ऐवजी पुढे निघून जातात. महाराष्ट्राला लाभलेला समुद्र किनारा पाहता निळ्या उष्णतेचे प्रमाण

महाराष्ट्रात अधिक आहे मात्र औद्योगिकीकरण व निसर्ग यांचा समतोल प्रस्थापित न करता आल्याने परिणामी हरित उष्णतेच्या बाबतीत महाराष्ट्र विकलांग होताना आढळतोय. यासाठी जमवलेले ढग जर बरसावायचे असतील तर मोठ्या प्रमाणात महाराष्ट्राला हरित आच्छादन वाढवावं लागेल. यासाठी माती आणि पाणी यांचा सहसबंध समजवून घेऊन तो वाढवणे देखील तितकेच आवश्यक आहे. या ऐवजी महाराष्ट्रात अधिकांश नदी किंवा धरण क्षेत्र हे वाहून आलेल्या मातीने भरल्याचे दिसून येतात. यामुळे नदी किंवा धरणांचा स्तर वाढल्याने पाणी जमिनीत पाझरण्याऐवजी ते वाहून जाते आणि या पाण्याच्या वाहण्याला अधिक गती असल्याने पुन्हा त्यासोबत माती वाहून जाण्यासह पाणी मुरण्याचा देखील प्रश्न उद्भवतो. यासाठी पाण्याची गती कमी करणे , त्याला चालवणे आणि मग थांबवणे आवश्यक आहे. हा सल्ला संत तुकारामांनी ,

बळ बुद्धी वेचूनिया शक्ती
उदक चालवावे बहू युक्ती

अशा काव्यपंक्तींतून शेकडो वर्षांपूर्वीच आपणास दिला होता मात्र आम्ही अशा सल्ल्यांना गंभीर न घेतल्याने महाराष्ट्र वारंवार वाढत्या पाणी संकटाच्या खाईत लोटला जातोय.

स्वातंत्र्योत्तर काळात मुख्यतः स्व.यशवंतराव चव्हाण यांनी सहकारला गती दिल्यानंतर महाराष्ट्राच्या पीक पद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल झाले; ज्याचे पाण्याच्या वितरणापासून ते सामाजिक, आर्थिक व राजकीय संरचनेत बदल होण्यापर्यंत परिणाम झाले. यात मुख्यतः उसाचे पीक आढळून येते. याने महाराष्ट्राची आर्थिक कमान उंचावली असली तरी दोन वर्गांतली आर्थिक दरी मात्र वाढवली. उस हे प्रचंड पाणी शोषण करणारं पीक. ज्याच्याकडे अधिक जमिनीची मालकी त्याच्याकडे अधिक उसाचे उत्पादन! त्याचबरोबर या उसासाठी लागणाऱ्या पाण्याच्या उपशावर मात्र कुठलेही बंधन न राहिल्याने अधिक जमीनदार अधिक पाणी उपासताना दिसतात. यातून ज्याची जमिन त्या जमीनिखालील पाणीही त्याचेच! अशीच धारणा महाराष्ट्रात उसामुळे बळावली. भूमिहीन किंवा अल्पभूधारक यांचा जणू पाण्यावर कुठलाच हक्क नाही अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाल्याचे चित्र आपण पाहू शकतो. परिणामी दुष्काळात एक वर्ग उस पिकवण्यासाठी भांडताना तर एक वर्ग पिण्याच्या पाण्यासाठी भांडताना आढळून यायला लागला. महाराष्ट्रातल्या कायम दुष्काळी प्रदेशांत ऊसाच्या पिकावर निर्बंध लादण्याचे प्रयत्नदेखील काही सूपीक बुद्धीच्या डोक्यांतून झाले मात्र उस उत्पादक आणि साखर कारखानदार हे दोन्ही वर्ग राजकीयदृष्ट्या परिपक्व असल्याने आपली राजकीय ताकद वापरुन त्यांनी हे प्रयत्न नेहमीच हाणून पडले आहेत. यामागचा या दोन्ही वर्गांचा स्वार्थ सर्वश्रूत आहे. यासाठी पाणी हे सार्वजनिक स्त्रोत असल्याने त्याच्या समन्यायी वितरणासाठी व भविष्यातील अनेक धोके टाळण्यासाठी निसर्गचक्राशी पूरक

पीकपद्धती बंधनकारक करणारे ठोस कायदे निर्माण होणे आवश्यक आहेत. ज्यामध्ये उसासारख्या पिकाला जमिनीतल्या प्रथम दर्जाच्या पाण्याऐवजी तृतीय दर्जाच्या पाण्याचा वापर करणे शक्य होऊ शकेल. ज्या तापमानावर उसापसून साखर निर्मिती होते त्या तापमानाचा विचार करता या तृतीय दर्जाच्या पाण्यातले प्रदूषण साखरेत उतरणे देखील अशक्य असल्याने हा मधला पूरक मार्ग होऊ शकतो.

महाराष्ट्रात सातत्याने अधिक पाणी टंचाईने ग्रासलेल्या भागांत अधिक पाणी असलेल्या भागांतून उचलून पाणी टाकण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले त्याचबरोबर नदीजोड प्रकल्पांच्या चर्चा देखील होताना आढळतात. आजमितीला अशा प्रकल्पांना पूर्णत्व देणे अशक्य नाही मात्र असे प्रकल्प हाती घेणे हे शेवटचे पर्याय असायला हवेत. त्याऐवजी त्या त्या प्रांतांत सहज उपलब्ध होऊ शकणाऱ्या बाबींना प्राधान्य द्यायला काय हरकत आहे. महाराष्ट्रात मात्र हजारो कोटी रुपये किंमत असलेल्या अनेक प्रकल्पांचा सर्रासपणे श्रीगणेशा करून नंतर ती बंद पाडली जातात. असे अनेक प्रकल्प प्रस्तावित व काही अपूर्ण असतांनाही अनेक नव्या प्रकल्पांचा तोपर्यंतच श्रीगणेशा होतोय. हे सगळं राजकीय गणितांना सांभाळण्यासाह अनेक गुत्तेदारांना पोसण्यासाठी तर नाही ना? मराठवाड्याच्या पाणी प्रश्नासंदर्भात अनेक प्रकल्पांना मंजुऱ्या दिल्या गेल्या. ज्यामध्ये "कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजनेचा" प्रामुख्याने उल्लेख करता येतो. मात्र शासकीय पातळीवरीलच विविध अडथळ्यांतून या प्रकल्पाला जावे लागत आहे. एकीकडे शेकडो कोटी रुपये त्यावर आजपर्यंत खर्च देखील झालेला आहे मात्र लालफितीत अडकलेला हा प्रकल्प सातत्याने पाणी टंचाईचा सामना करणाऱ्या मराठवाड्याच्या एका विशिष्ट भागासाठी अत्यंत हितकारक असताना त्यासाठी केवळ निधी मंजुरीची आठवण निवडणुकांच्या तोंडावरच का होते? आणि निवडणूका संपल्या की तो प्रकल्प ठराविक रक्कम खर्चून पुन्हा लालफितीत का गुंडाळला जातो? हे तिथल्या सामान्य माणसांना गोंधळात टाकणारे प्रश्न आहेत. हीच अवस्था इतर अनेक प्रकल्पांची देखील आहे. अशातच पुन्हा नव्याने वॉटर-ग्रीड नावाच्या नव्या प्रकल्पाचा देखील नुकताच श्रीगणेशा झालेला आपणास दिसून येतो. आशा करुयात की त्याच्या अंमलबजावणीचा हेतू तरी साफ असावा. अशा अनेक नव्या प्रकल्पांतून प्रांतनिहाय उभे राहिलेले वाद हा एक अतिशय जटिल प्रश्न शासनासमोर असताना मग पुन्हा हे प्रकल्प नवे संकट उभे करताना आढळतात त्यात पुन्हा विस्थापितांचा प्रश्न आहेच. अशा अनेक अंगांनी पाणी संकट महाराष्ट्राला कोंडीत पकडत आहे.

## निष्कर्ष व शिफारशी (Conclusions and Recommendations) :

महाराष्ट्राच्या पाणी संकटाचे निवारण मुख्यतः राजकारणाने अधिक प्रभावित असल्याने त्याला सकारात्मक दिशा प्राप्त होताना दिसत नाही. पाणी हा अनेक नव्या समस्यांना जन्म घालणारा मुद्दा आहे. भविष्यातली डोकेदुखी थांबवण्यासाठी आता हा प्रश्न लोकचळवळीच्या ऐरणीवर येणे अधिक आवश्यक आहे. पाणी संवर्धन हा केवळ एक विचार नाही तर ती आता सवय व्हायला हवी. यासाठी शासन किंवा अनेक स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन समुदाय संघटन, सामाजिक कृती, जनवकालत अशा अनेक अंगांनी पाणी प्रश्न हाताळण्यासाठी सरसावायला हवे. त्यासाठी जलसाक्षरता देखील मोठ्या प्रमाणात घडून यायला हवी हे सगळं घडून आणण्यासाठी प्रबळ इच्छाशक्तीची नितांत आवश्यकता आहे. ती शासन, प्रशासन व समाज दरबारी निर्माण झाली तर समृद्धीचा वारसा असलेला महाराष्ट्र पाणी संकटाच्या विळख्यातून बाहेर पडायला अधिक वेळ लागणार नाही. हा अदम्य विश्वास समृद्धीची परंपरा अखंडित करण्यासाठी आपल्या प्रत्येकाची जबाबदारी समजून आपण बाळगूयात, महाराष्ट्राला अधिक समृद्ध बनवूयात.

## संदर्भ(References) :


- पडवळ,राजन आणि हातेकर, नीरज दोन जुने अभिजात अर्थशास्त्रीय निबंध (२०१४) (.सं)\- (दुष्काळ हा गोविंद गोपाळ टीपणीस लिखित निबंध हिंदुस्थानातील), लोकवाङ्मय गृह प्रकाशन
- लोकराज्य (२०१९जून )
- महाराष्ट्रातील दुष्काळ जनतेच्या नजरेतून :(मार्च २०१९(, मासीक आंदोलनशाश्वत - विकासासाठी


* * *

# इस्लामिक बँक आणि महिला बचत गट या संस्थेच्या मध्यमाने मुस्लिम महिला व तालक पिडीत महिलांचा विकास एक अध्ययन

**डॉ. नजीर जब्बार शेख**
*मार्गदर्शक*
संशोधन केंद्र, मानवलोक समाजकार्य
महाविद्यालय,अंबाजोगाई, जिबीड.

***समीर इब्राहीम शेख***
संशोधक,
संशोधन केंद्र, मानवलोक समाजकार्य
महाविद्यालय, अंबाजोगाई

**१) प्रस्तावणा :**

समाजात विषमता कमी करण्यासाठी विविध विकास योजना चळवळी आहेत. या योजनेचा लाभ घेऊन विकासात सहभागी होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महिलांच्या विकसाठी या योजना प्रयत्न शील आहेत. समाजातील परिवर्तनाची दिशा स्वयंसहायता बचत गटामुळे निर्माण होऊ लागलेली आहे. बचतगटा द्ववारे महिलांचे विविध स्तरावर सबलीकरण होत आहे. कोणत्याही समाजाचा विकास सध्य करण्यासाठी त्या समाजाचा आर्थिक, शैक्षणीक, समाजीक, व राजनितीक विकास होणे अतीश आवश्यक आहे. यात सर्वात प्रथम शैक्षणीक आणि आर्थिक विकास होणे खुप गरजेचं असतं. शैक्षणीक आणि आर्थिक विकास झाल्यानेच इतर विकास साध्य होऊ शकतो. याचं कारण प्रत्येक घटकाचे विकास एकदुसऱ्यावर अवलंबुन असतं. तसेच सर्वात महत्वचं आर्थिक विकास असतं, कोणत्याही समाजाचा आर्थिक विकास जोप्रर्यंत होत नाही तो प्रर्यंत शैक्षणीक विकास, सामाजिक विकास, मानसीक विकास व राजनैतीक विकास साध्य होत नाही. समाजात मानसाची आर्थिक विकास भकम असल्याने मानुस चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊ शकतो. तसेच चांगला शिक्षण घेऊन समाजात नावलोकीक करु शकतो व समाजाचा प्रतीनिधीत्व करु कशतो. आर्थिक विकास हे सामाजिक विकासचा पाया आहे. पाया मजबुत झाल्यानेच इतर विकास साध्य होऊ शकतो.

भारतीय समाजात महिला अतिशय महत्वाचा घटक आहे. भारतात जनसंख्याच्या आर्धा भाग महिलांच्या आहे. महिला जनसंख्याच्या आर्धा भाग असल्याने आर्धा हिश्याच्या प्रतिनिधित्व करतात, म्हणुन विकास कार्यक्रमातील त्यांची भागीदारी अपरिहार्य आहे. आर्थिक विकास असो किंवा सामाजिक विकास असो कोणत्याही विकास त्याच्या बाबतीत महिलांनी आपली विधायक भूमिका बजावल्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. समाजात सामाजिक विषमता अस्तित्वात असली तरी महिलांच्या सामाजिक दर्जात मोठया प्रमाणात सुधारणा घडून आल्याने आज महिला अच्च पदे भूषवित आहेत. समाजाच्या भवितव्याला दिशा आणि आकार देण्यासाठी महिलांची भुमिका निर्णायक आहे. भारतात विविध धर्माचे लोक राहतात, आपल्याला माहित आहे की, भारतात आर्ध्या हिश्याचे प्रतिनिधित्व महिला करतात पण या आर्धी जनसंख्या मध्ये मुस्लिम महिलांच्या पण सहभाग आहे व

त्यांना विसरता कामा नये. मुस्लिम महिला भारतीय समाजाच्या भाग असल्याने त्याच्या आर्थिक, शैक्षणीक, सामाजिक, मानसीक व राजनैतिक विकास होणे खुप गरजेचं आहे. सर्वात प्रथम जर मुस्लिम महिलांच्या आर्धिक व शैक्षणक विकास साध्य करायचे असल्यास त्यांना मुख्य प्रवाहत आणने आवश्यक आहे. अनेक मुस्लिम महिला गरीब व मागासलेले आहे. तसेच त्याची आर्थिक आणि शैक्षणीक प्रगती खालवलेली आहे. मुस्लिम महिलांत सर्वात जास्त ग्रामिण भागात, झोपडपटी मध्ये राहनारे तसेच तलाक पिडीत, विधवा महिलंनकडे लक्ष देणे खुप गरजेचं आहे. कारण आर्थिक विकासाचा प्रमाण कमी असल्याने त्यंच्या शैक्षणीक विकास होऊ शकत नाही. जर मुस्लिम महिलांच्या आर्थिक विकास सध्य करायच्या असलयास महिलां बचत गट व इस्लामिक बॅंकेची संकल्पना स्विकारल्याने मुस्लिम महिलाच्या विकास सध्य करता येऊ शकते. याचं कारण असा की, ग्रामीण, झोपडपटी भागात महिलांच्या अनेक छोटे मोठे घरी चालनारे उद्योग असतात तसेच विधवा आणि तलाक पीडीत महिलांकडे कोणताही कमाईचा मार्ग नसतो तर अशी महिलांना जर इस्लामिक बॅंक व बचत गटाच्या माध्यमाने जर वितीय सुविधा पुरविण्यात आली तर अश्या महिलांच्या विकास सध्य होऊ शकतो. म्हणुन मुस्लिम महिलाच्या विकास सध्य करण्यासाठी बचत गटाला इस्लामिक बॅंकेची संकल्पना जोडुन मुस्लिम महिलांच्या विकास साध्य होऊ शकतो हे दाखविण्यासाठी याबाबीचा विचार करुण याचा शोध घेण्याच्या प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**२) संशोधन साहित्याचया आढावा:**

**१) चौधरी राजेश (२०२२)**

सदर पुस्तक **महिला बचत गट मार्गदर्शीका** या पुस्तकात लेखकाने बचत गटाची संकल्पना तसेच बचत गटाचे कार्यावर भाष्य केले आहे. बचत गटाचे कार्य प्रणाली, सभासद संख्या व कायदे विषयक माहिती सदर पुस्तकात देण्यात आली आहे.

**२) सदाशिव गितांजली मोटे (२०१३)**

संशोधिकाने सदर संशोधन **ग्रामीण महिला सक्षमीकरणात बचतगटाचे योगदान एक समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ अंबाजोगई तालुका** या विषयात पुर्ण केले आहे. तसेच सदर संशोधन डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला सादर केले आहे. सदर संशोधनात संशोधिकाने महिला सक्षमीकरणाचे महत्व व गरज स्पष्ट केले आहे. तसचे ग्रामीण महिलांना आर्थिक, शैक्षणीक, सामाजिक, मानसीक व राजनैतीक विकासात बचतगाटाच्या महत्व व योगदानाला स्पष्ट केले आहे.

**३) Hasan Kabir (2007)**

प्रस्तुत पुस्तक Handbook of Imslamic Banking,Lewis, Mervyan K UK.
लेखकाने सदर पुस्तकात ईस्लामिक बॅंकेची संकल्पना स्पष्ठ केली आहे. तसेच इस्लामिक बॅंकेची परिभाषा व इस्लामिक बॅंकेची कार्य पध्दती सदर पुस्तकात स्पष्ट केली आहे.

**३) संशोधनाचे महत्व :**

इस्लाम धर्मात व्याजने पैशे देण्याची आणि व्याजने पैशे घेण्याची पध्दत नाही. व्याज ने पैसे देने घेणे हे गैर इस्लामिक तसेच गुन्हा आहे. महिला बचत गटात महिलांना बँकेतुन व्याजने पैशे घ्यावा लागतं. त्यामुळे मुस्लिम महिला जास्त प्रमाणात महिला बचत गटाचा फायदा घेत नाही. मुस्लिम महिलांसाठी किंवा इतर महिलांसाठी ईस्लामिक बँकची संकल्पना स्विकाल्याने बिन व्याजचे पैशे लोन म्हणुन मिळु शकते. महिला बचत गटात मुस्लिम महिलांच्या सहभाग होऊ शकतो. म्हणुन या शोधनिबंधात इस्लामिक बँक व बचत गट याच्या माध्यमाने मुस्लिम महिला तसेच इतर महिलांच्या विकास सध्य होऊ शकतो. हे दाखविण्याच्या प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**४) संशोधनाचे उदिष्ट :**

**अ) तलाक पिडीत, विधवा मुस्लिम महिलांच्या इस्लामिक बँक व बचत गटाच्या माध्यमाने आर्थिक विकास याचं अभ्यास असणे .**

**ब) इस्लामिक बँक आणि बचत गट याच्या महत्व अभ्यासणे.**

**५) संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध लिहण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषनात्मक संशोधन पध्दतीच्या वापर करण्यात आलेला आहे.

**अ) तथ्य संकलनाचे स्त्रोत :**

**१) दुय्यम स्त्रोत :**

विषयाशी संबंधीत पुस्तक व ओनलाईन साईडसच्या तसेच संदर्भ ग्रथाच्या वापर करण्यात आले आहे.

**६) बचत गटाची संकल्पना:**

पैश्याची बचत करणे हे महिलांच्या स्वभाव आहे. रुपयातले दोन पैशे कसे वाचवावेत हे महिलांकडूनच शिकावे, असे सांगितले जाते आणि हे शंभर टक्के खरे आहे. घरात पैशे असणे हे वेगळे पण त्या पैश्या मधुन बचत करणे हे वेगळे. जिवनात पैसा कशासाठी असतो याचे रहस्य ज्याला कळाले, त्यालाच बचत करण्याचे महत्व कळाले, असे निर्विवादपणे म्हणता येईल. आपल्या अडचणींच्या वेळी बचतीतून अर्थसाहाय्य करणे, आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी स्वत:चे बीज भांडवल तयार करणे या दृष्टिकोनातून हे गट स्थापन केले जातात. संघटित महिलांची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने तयार झालेल्या गटाला स्वयंसाहाय्यता गट अथवा बचत गट असे म्हटले जाते. आपण स्वत: बचत करावी व त्या बचतीद्वारे कर्ज घेऊन उद्योग-व्यवसाय उभारुन स्वावलंबी व्हावे हा बचत गटाच्या स्थापनेमागील महत्वपूर्ण उदेश असतो.

**बचतगटाचा महत्व :**

बचतगट महिला संक्षमीकरणासाठी प्रभावी माध्यम आहे. बचतगटाच्या माध्यमातुन असहाय व दारिद्रयामध्ये जीवन जगणाऱ्या लोकांच्या आयुष्यात क्रांतिकारक बदल घडुन आला आहे. बचत गटा मध्ये महिलांच्या अधिक पुढाकार आहे. ग्रामीण मलिनी बचतगटाच्या माध्यतमातुन आर्थिक,

सामाजिक व राजकीय दृष्टया सक्षम होण्याच्या निर्धार केला आहे. निराक्षरता दारिद्रय, व्यसनधिनता, रुढी परंपरा, पुरुषी वर्चस्व, कौटुंबीक आणि सामाजिक आत्याचार याच्या विळख्यात खितपत पडलेल्या असहाय अबला यांच्या जिवनात बचतगट या शब्दाने एक नवीन आशाची करण उगवलेली आहे.

**बचत गटाची कार्यपध्दती :**

महिला बचत गटामध्ये ग्रामीण भाग व झोपडपट्टी च्या भागा मध्ये महिला स्वत:ची ठरविलेली बचतीची रक्कम एकत्र करतात. गरजू सभासद महिला आपल्या आवश्यकतेनुसार आर्थिक साहाय्याची मागणी करतात. हे साहाय्य देण्याबाबत सामूहिक व लोकशाही पध्दतीने निर्णय घेतले जातात. तसेच कुटीर उद्योग व लघु उद्योग करण्यासाठी सरकारी व खासगी बँके कडुन लोन पण घेतले जाते. ज्या महिलांकडे जास्त बचत नाही त्याना बचत गटामध्ये सहभागी करुन त्यांच्यासाठी लोनची व्यवस्था केली जाते.

१) बचत गटात गटामध्ये सभासदांची संख्या मर्यादित असते. किमान १० व जास्तीत जास्त २० सभासद असल्यामुळे सर्व सभासदांचा एकमेकांशी चांगला संपर्क राहतो.

२) किती बचत घ्यावी, किती सभासद घ्यावेत, किती कर्ज द्यावे, किती सेवा शुल्क आकारावे इत्यादी नियम या गटातील सभासद स्वत: ठरवितात.

३) महिन्यातील ठरावीक दिवशी सर्व सभासद एकत्र जमून बचत जमा करतात.

४) ज्यांना कर्ज आवश्यक असते, त्यांचे कर्ज-मागणी अर्ज घेतले जातात. प्रामुख्याने घरगुती अडचणी निवारण्यासाठी किंवा उद्योग – व्यवसाय करण्यासाठी हे कर्ज दिले जाते.

५) गट चालविणाऱ्या संघटकांना व गटाच्या सभासदांना गटाच्या कामकाजासंबंधी वेळोवैळी प्रशिक्षण दिले जाते. बचत गट चालविणाऱ्या संघटक वारंवार भेटतात व एकमेकांच्या अनुभवाची देवाणघेवाण करतात.

६) सर्व कामकाजाची तपशीलवार नोंद ठेवली जाते व प्रत्येक सभासदाला पासबुक दिले जाते.

बचत गट मलिा सक्षमीकरणासाठी प्रभावी माध्यम आहे. सादरणत: बचत गटाची वरील प्रमाणे कार्यपध्दती आहे.

**स्वयं सहायता बचतगटाची पार्श्वभुमी:**

बांग्लादेशातील चित्तगाव विद्यापीठातील अर्थशास्त्र विषयाचे अध्यापक व जगप्रसिध्द ग्रामीण बँकेचे प्रणेते आणि २००६ चे जागतीक शांतता नोबेल पुरस्काराचे मानकरी असणारे प्रा.डॉ. महंमद युनुस यांनी प्रथम स्वयंसहाय्यता गटाची मुहूर्तमेढ रोवली. बांगलादेशात १९७४ मध्ये दुष्काळाची स्थिती असताना चित्तगाव विद्यापीठाच्या जवळ **जोबरा** भुमिहीनांच्या गावात महिला जगण्यासाठी धडपड होत्या. सावकारी पाशात अडकलेल्या लोकांना कसलाही आर्थिक आधार नव्हता. म्हणुन डॉ. युनुस यांनी जोबरा गावातील ४० जणांना आपल्या खिशातून कर्ज रुपात पैशे दिले. ही कर्जे अत्यल्प होती. कोणतीही बँक अशी कर्ज देत नाही. अशा विनातारण कर्जाची परतफेड वेळेत करण्यात आली. गरीबांना दिलेली कर्ज बुडणारच ही कल्पना बँकेची होती. परंतु डॉ. महंमद युनुस यांनी ती फोल

ठरविली. त्यांच्या मते गरीबांना दिलेली कर्जे ते पूर्ण रकमेसह वेळेत परत करतात याचा अनुभव जोबरा गावात आला.भारतात स्वयं सहायता बचत गटाची सुरुवात १ एप्रिल १९९९ पासुन स्वर्णजयंती ग्रामरोजगार योजनांअंतर्गत स्वयंसहाय्यता बचतगटांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात झाली.

**इस्लामिक बँकेची संकल्पना :**

इस्लामिक बँक इतर बँके प्रमाणेच एक बँकिंग व्यवस्था आहे. या बँकिं प्रणाली मध्ये कुरआन आणि हदिस प्रमाणे तत्वाला स्विकारुन या बँकिंग प्रणालीची उभारणी करण्यात आली आहे. इस्लाम धर्मात व्याजला **"रिबा"** असे म्हटल्या जाते. रिबा हा अरेबीक शब्द आहे. म्हणुन कुरआनात सुरा २ अलबकरा आयात नंबर २७५ आणि २७६ मध्ये व्याज (रिबा) देणे आणि घेण्याची प्रक्रियाला इस्लाम धर्मात निषिध्द मानले गेले आहे.

"परंतु जे लोक व्याज खातात त्यांची दशा त्या माणसाप्रमाणे असते ज्याला शैतानाने स्पर्श करुन झपाटून सोडले आहे. आणि ते या दशेत गुरफटण्याचे कारण हे आहे की ते म्हणतात, व्यापारदेखील शेवटी व्याजासारखीच गोष्ट आहे. वास्तविक पाहता अल्लाहने व्यापाराला वैध केले आहे आणि व्याजाला निषिध्द. म्हणून ज्याला त्याच्या पालनकर्त्याकडून हा उपदेश मिळेल आणि तो भविष्यात व्याज खाण्यापासून परावृत्त होईल. तर जे काही त्याने पूर्वी खाल्ले असेल ते खाल्ले, त्याचे प्रकरण अल्लाहच्या स्वाधीन आहे. आणि जो या आज्ञेनंतर त्याच गोष्टीची पुनरावृती करील तो नरकवासी आहे, जेथे तो सदैव राहील." (सुरा २आ २७५)

"अल्लाह व्याजाचा हास करतो आणि दानधर्माची वाढ करतो आणि अल्लाह कोणत्याही कृतघ्न आणि वाईट आचरण करणाऱ्याला पसंत करत नाही." (सुरा २ आ २७६)

**इस्लामिक बँकेच्या इतिहास :**

काही संशोधकाच्या मते इस्लामिक बँकिंगची उत्पती सातव्या शतकात इस्लाम धर्माच्या अगदी सुरुवातीस झाली आहे. पाकिस्तान देशात इस्लामिक बँकिंगची सुरुवात १९५० मध्ये झाली होती. मलेशीया या देशात नागरीकांना हज करण्यासाठी बिनव्याज वित्तीय सहायता देण्यात आली होती. या वितीय सहायता देणारी कंपनीचे नाव तबांग हाजी असा होता. दुबई मध्ये पहिली आधुनीक इस्लामिक बँक १९७९ मध्ये स्थापीत करण्यात आली होती. तसेच पहिली इस्लामिक विमा कंपनी १९७९ मध्ये स्थापित झाली होती.

**इस्लामिक बँकेची कार्य प्रणाली :**

इस्लामिक बँक ही इतर बँक प्रमाणे बँकिंग व्यवस्था आहे. या बँकेत ग्राहकाला आपल्या मर्जीनुसार पैसे टाकता येतात व काढताही येतात. या बँकिंग मध्ये बचत खात्यावर व इतर कोणत्याही खात्यावर व्याज दिला जात नाही. मात्र या रकमेच्या वापरातून बँकेला काही फायदा झाला तर इस्लामिक बँक आपल्या ग्राहकांना भेटीच्या (हिबा) स्वरुपात काही पैसे देते. हिबा हा एक अरेबीक शब्द आहे, तसेच हिबाचा अर्थ वस्तु भेट देणे असा होतो. पारंपरिक बँक व इस्लामिक बँक यांमध्ये महत्वाचा भेद म्हणजे ही बँक कर्जावरील व्याजाच्या स्वरुपात नफा मिळवीत नाही, तर गुंतवणुकीतून नफा प्राप्त करते. इस्लामिक बँक निष्पक्षपात सहभागीता प्रणालीचा उपयोग करतात. एखाद्या

ग्राहकाला व्यवसायासाठी ही बँक कर्ज देते. मात्र त्या कर्जावर व्याज आकारत नाही. ग्राहकाने उभारलेल्या व्यवसायातून मिळालेल्या नफयातील एक हिस्सा ग्राहक स्वखुशीन बँकेला देतो. जर व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जावर कोणत्याही प्रकारचा नफा मिळाला नसेल, तर तो ग्राहक बँकेत कजाच्या मूळ रकमेशिवाय जास्तीची रक्कम जमा करत नाही. अशा वेळी बँकिंग मध्ये भांडवल उभे करण्यासाठी बिनब्याजी कर्ज दिले जात असले, तरी दारु, बंदूक, डुकराच्या मांसाचा व्यापार, अश्लिल चित्र फित्रफित इत्यादी समाजविघातक व्यवसायांकरिता ही बँक भांडवल उभे करण्यासाठी कोणत्याही स्वरुपाची मदत करत नाही.

**वित्तपुरवठा करण्याचे प्राकार:**

**१) वाहिद (ठेवी):**

इतर बँके प्रमाणेच इस्लामिक बँक ठेवी स्वकारते. ग्राकाला आपल्या जवळील रोख रक्कम किंवा इतर मालमता बँकिकडे सुरक्षित ठेवण्याकरिता जमा करता येते. या सेवामध्ये बँक ग्राहकाला त्याची रक्कम किंवा मालमता सुरक्षित ठेवण्याची हमी देते. ग्राहकाला त्यानी ठेवलेली ठेवी केव्हाही काडता येते. बॅक या सुरक्षित ठेविवर शुल्क आकारु शकते, तर कधी ग्राहकाला पैसे भेट स्वरुपात देते. ग्राहकानी जर इस्मामिक बँकेत ठेवीच्या स्वरूपात पैशे ठेवले तर बँकति रकम कोणत्याही व्यापारात गुतवणुक करून नफा कमवते तसेच तो नफा ग्राहका मध्ये वाटुन घेते. तसेच नफयाच्या टक्के वारी निश्चित नसते.

**२) मुदारबाह (प्रॉफिट शेअरिंग) :**

मुदारबाह हा गुंतवणूकदार (रब-उल-माल) आणि उद्योजक (मुदारीब) यांच्यातील नफा वाटणी करार आहे. या मध्ये गुंतवणूकदार भांडवल पुरवितो, तर उद्योजक व्यवस्थापनाची जबाबदारी किंवा प्रत्यक्ष व्यवसाय चालवितो. इस्लामिक न्यायशास्त्रात प्रत्येकाची जबाबदारी आणि कर्तव्य सांगितलेल्या आहे, मात्र त्यांचे पैशे योग्य रीतीने गुंतविले जावे, यासाठी गंतवणुकदार काही अटि निश्चित करतो. या व्यवसायातुन झालेला नफा कराराप्रामाणे दोघांमध्ये वाटून घेतला जातो. जर तोटा झाला तर गुंतवणुकदाराला सहन करावा लागतो.

**३) मुराबाहा (कॉस्ट प्लस प्रॉफिट) :**

या व्यवस्थेंतर्गत बँक विक्रेत्याजवळून निश्चित किमतीत एखादी वस्तू खरेदी करते. या सस्तूवर झालेला खर्च व काही लाभ किंवा नफा जोडून ती वस्तू दुसऱ्याला विकली जाते. म्हणजेच मुराबाहामध्ये खरेदी - विक्री व्यवहारातून नफा मिळविला जातो. इस्लामिक बँक येथे फक्त एक मध्यस्थी किंवा दलालाची भूमिका निभावते.

**४) मुशाराकाह (जॉइंट व्हेंचर) :**

गुंतवणूकदार व ग्राहक संयुक्तपणे मालमता, उपकरण विकत घेतात किंवा एखाद्याव्यवसायात भाग घेतात. यांच्यात गुंतवणुकीच्या प्रमाणात मालकी हक्क ठरतो. तसेच गुंतवणुकदार व ग्राहक टोट्यातील गुणेत्तर प्रमाणात नुकसानही वाटल्या जाते. मात्र ग्राहक जसजसा गुंतवणूकदाराच्या रोख्यांचा एकक विकत घेतो,त्याप्रमाणात गुंतवणुकदाराला देय असलेले भाडे कमी होते शेवटी सर्व

एकक ग्राहक विकत घेतो, तेव्हा त्या मालमतेवर संपूर्ण मालकी किंवा हक्क ग्राहकांचा होतो. प्रामुख्याने हे चार वित्तपुरवठा करण्यासाठी प्रकार आहे. परंतु इतर प्रकार पण आहे तो खालील प्रमाणे.

**५) इस्तिस्ना (विक्रीव्यवहार)** इस्तिस्ना हा एक विक्रीचा व्यवहार आहे. या व्यवहारामध्ये वस्तूची निर्मिती होण्यापूर्वीच देवाण घेवाण केली जाते.

**६) इस्तीजर (हायर पर्चेस)** : हा भाडेपट्टी करण्याचा एक करार आहे. या करारामध्ये एखाद्या व्यक्तिची मालमता ही दुसऱ्या व्यक्तीला भाड्याने वापरण्याची परवानगी बँक देते. ही परवानगी देताना कालावधी व भाडे ठरविले जाते.

**७) हिबा (गिफ्ट)** : इस्लामिक बँक ही इतर पारंपारिक बँकेप्रमाणे बचत ठेवीवर व्याज देत नाही. मात्र या बचत ठेवीमुळे बँकेला काही आर्थिक लाभ झाला, तर ही बँक आपल्या स्वेच्छेने ग्राहकाला हिबा म्हणजेच काही पैसे भेट म्हणून देऊ शकते.

वरील प्रमाणे वित्त पुरवठा करण्याचे प्रकार आहे. इस्लामिक बँक नैतिक व सामाजिक मूल्ये असलेली बँक आहे. तसेच इस्लाम धर्मातील नितिमुल्यावर आधारीत आहे. त्यामुळे इस्लामिक बँक समाजात नैतिक व सामाजिक दाईत्व पारपाडते. समाजात गरीब आणि गरजु लोकांना व आजारी किंवा एखाद्या ग्राहकांना प्रकृती स्वास्थासाठी आरोग्यासाठी पैशे पाहिजे असेल तर इस्लामिक बँक अर्थ सहाय्य करतात.

**मुस्लिम महिलां किवा इतर गरीब व गरजु महिलांच्या विकास करण्यासाठी बचत गट संस्था इस्लामिक बँकेच्या मध्यमाने कशा पध्दतीने फायदा घेऊ शकतो.**

भारतीय समाजात गरिब मुस्लिम महिला पुर्ण भारतात आहे. विशेष: ग्रामिण भागात व झोपड पट्टीत राहणारे महिलाना आर्थिक सक्षम करण्याची खुप गरज आहे. तर बचट गट इस्लामिक बँकेच्या माध्यमाणे मुस्लिम महिलाना विशेष: ग्रामिण आणि झोपड पट्टीत राहणारी महिलाना वित्त पुरवठा करुन देऊ शकतो. तसेच इतर धर्मिय महिलाना जर बिनव्याज वित्तपुरवठ्याचा लाभ घ्याचा असेल इस्लामिक बँकेचा माध्यमाने लाभ घेऊ शकते. समाजात कोणताही समुदाय असो कोणताही धर्माचा समुदाय असो त्या समुदायाचा दृष्टीकोणाने त्यांच्या विकास साध्य झाला पाहिजे. याचं कारण असा काही सांस्कृतीक आणि धार्मिक रोगथाम असल्याने समुदाय किंवा समुहाचा विकास होत नाही. अशा समुहाना आणि समुदायाना सोईस्कर मार्ग तसेच संस्कृती व धर्माना मान्य असलेला मार्ग मोकळा करुण देण्याची खुप गरज आहे.

मुस्लिम महिलाना तलाक झाल्या नंतर आणि इतर धर्मिय महिलांना घटस्फोट झाल्या नंतर तसेच महिला विधवा झाल्यानंतर महिलाना काही आर्थिक आधार नसतो. विशेष: मागाअसलेली महिला व गरीब महिलाच्या जर आपण विचार केलो तर आपल्याला हे कळतं की अशा महिलाना आर्थिक आधार नसतो. तर या परिस्थिती मधे महिला बचत गट संस्था मुस्लिम महिलाना त्याच्या संस्कृती व रुढी प्रमाणे वितपुरवठा करण्याची व बिनव्याज लोनच्या लाभ देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारना इस्लामिक बँकेची संकल्पना स्विकारण्याची मांगणी करु शकते. जर असा झाल्याने बचत गटात

मुस्लिम महिलांच्या सहभाग भक्कम स्वरुपात वाढु शकतो. २००८ साली माजी रिजर्व बँक गवर्नर रगुराम राजन यानी रिजर्व बँकेची रिपोर्ट मध्ये इस्लामिक बँक ऊघडण्याची मांगीणी केली होती.

**निष्कर्ष:**

मुस्लिम लोकांना व्याज रहित वित्तपुरवठा स्विकार नाही. इस्लाम धर्मात व्याज देणे आणि घेणे याची मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे मुस्लिम महिला बचत गटापासुन खुप दुर राहते. याचं कारण बचत गटात महिलांना बँकेतून लोन घ्यावा लागतं, आणि तो व्याजरहित लोन असतं. जर गरजु मुस्लिम महिलांच्या विकास साध्य करायचा असेल तर बचत गटाला लघु वितपुवठा (माइक्रो फाइनान्स) करण्यासाठी इस्लामिक बँकेची संकल्पना स्वकारण्याची आवश्यकता आहे.

समाजात तलाक पिडीत, घटस्फोटीत, विधवा मुस्लिम महिला तसेच समाजाचे इतर मागासवर्गीय महिलांच्या विकाससाध्य करण्यासाठी इस्लामिक बँकेला बचतगटाशी जोडणे आवश्यक आहे. कारण महिला बचत गट महिलांच्या विकास करण्यासाठी व संक्षमीकरण करण्यासाठी प्रभावी माध्यम आहे. तसेच इस्लामिक बँक प्रणाली बिनव्याज बँकिंग प्रणाली आहे. इस्लामिक बँक ही इस्लामिक नितिमुल्यावर आधारीत आहे. इस्लामिक बँक ही धर्मदाय संस्थाना देणग्या, तसेच गरीब ग्राहकांना विशेष सेवा देते. जर एखद्या ग्राहकाला प्रकृती स्वास्थासाठी रुग्णालयामधे जाण्याची आवश्यकता असले तर तर बँक त्या मानसाना व्याज मुक्त कर्ज देते.

**सिफारीशे:**

१) इस्लाम धर्मात व्याज मान्य नसल्यामुळे इस्लाम धर्मिय लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी इस्लामिक बँकेची संकल्पना स्विकारण्याची आवश्यकता आहे. बँकिंग कायदा १९४९ मध्ये दुरुस्ती करुन इस्लामिक बँकेची संकल्पनेला स्विकारुन त्याला मान्यता दिली पाहिजे.

२) तलाक पिडीत, विधवा, गरीब महिलांना वित्त पुरवठयाच्या आधार नसतो. त्या मुळे मुस्लिम महिला बचत गटापासुन खुप लांभ आहे. त्यांना जवळ करण्यासाठी मुख्य प्रवाहा आनण्यासाठी इस्लामिक बँकची संपल्पनेला स्वकार करण्याची खुप गरज आहे. तरच मुस्लिम महिला विशेष: तलाक पिडीत, विधवा व गरिब मुस्लिम महिलांचा विकास साध्य होऊ शकतो.

३) २००८ मध्ये रिजर्व बँकेने माजी रिजर्व बँकेचे गवर्नर रगुरामराजन यांच्या नेतृत्वा मध्ये जारी केलेली रिपोर्ट मध्ये इस्लामिक बँकेची शिफारीश केली होती ती शिफारीशला लागु करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथसुची :**

१) चौधरी राजेश (२०२२), महिला बचत गट मार्गदर्शीका, नारायण पेठ पुणे.

२) सदाशिव गितांजली मोटे (२०१३), ग्रामीण महिला सक्षमीकरणात बचतगटाचे योगदान एक समाजशास्त्रीय अभ्यास.

३) **Hasan Kabir (2007),** Handbook of Imslamic Banking,Lewis, Mervyan K UK.

४) डॉ.सुनिल शिंदे योजना जून २०१० ग्रामीण महिलांचा आर्थिक विकासात बचतगटाची भुमिका आणि महत्व.

५) डॉ. ए. एन. अग्निहोत्री २००८ " महिला सशक्तिकरण और कानून, सरस्वती प्रकाशन, कानपुर,

६) http://www.youtube.com/@hashmiinstitute4856

७) youyube.com/FaizSyedOfficial / irc-india.com

८) http:www.youtube.com/@AskMuftiTariqMasood

९) https:bit.ly/2YzFRct

१०) http://www.businesskar.com/bachat-gat-benefits-marathi/

* * *